दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५४ | बुधवार दि.१३ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आव्हान अर्थसुरक्षेचे : राष्ट्रहित, वास्तव आणि तडजोडीची गरज

जागतिक अर्थकारणाच्या अस्थिर वादळात भारत पुन्हा एकदा एका निर्णायक वळणावर उभा आहे. पश्चिम आशियातील तणाव, इराणसंदर्भातील युद्धजन्य परिस्थिती आणि त्यामुळे भडकलेले कच्च्या तेलाचे दर यांचा परिणाम केवळ आंतरराष्ट्रीय बाजारापुरता मर्यादित राहत नाही; त्याचे थेट प्रतिबिंब भारताच्या अर्थव्यवस्थेवर उमटते. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि आयात–आधारित ऊर्जाव्यवस्थेच्या देशासाठी ही परिस्थिती धोक्याची घंटा ठरते.

# दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा मार्ग मोकळा

## ३५ लाख शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारने थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर करण्याच्या हालचाली वेगाने सुरू केल्या असून, मेअखेर होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. प्राथमिक माहितीनुसार राज्यातील सुमारे ३४ ते ३५ लाख शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ मिळू शकतो.**



कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने राज्यातील बँकांकडून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार तसेच नियमित कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती मागविली होती. तब्बल ५४ रकान्यांमध्ये ही माहिती संकलित करण्यात आली असून ती आता राज्य सरकारकडे सादर करण्यात आली आहे. या माहितीत बँकेची शाखा, आयएफसी कोड, संस्था आयडी, सभासद क्रमांक, आधार क्रमांक, शेतकऱ्याचे नाव, लिंग, जात, मोबाईल क्रमांक, पत्ता, जिल्हा, तालुका, गाव, अॅग्रीस्टॅक क्रमांक, जमीन नोंद प्रकार, बचत खाते क्रमांक, मंजूर कर्ज रक्कम, कर्ज वितरण दिनांक, पीककर्जाचे स्वरूप, पिकाचे नाव, परतफेडीची मुदत, व्याजासह परत केलेली रक्कम आदी तपशीलांचा समावेश आहे. विशेष म्हणजे २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांतील थकबाकीदार आणि ▶▶ पान २ वर

# 'नीट' प्रश्नपत्रिका फुटण्यामागे नाशिक आग्रस्थानी!

## एकास अटक, राजस्थान पोलिस पथक नाशिकमध्ये येणार




### ३ मे रोजी झालेली निट परीक्षा अखेर रद्द

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लागलेल्या नीट परीक्षेबाबत केंद्र सरकारने अखेर मोठा निर्णय घेतला आहे. पेपरफुटीच्या आरोपांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेली ३ मे २०२६ रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राष्ट्रीय चाचणी संस्थेने घेतला असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून परीक्षेतील गोंधळावरून देशभरातून संताप व्यक्त केला जात होता. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून यातील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी सीबीआयमार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. तपासादरम्यान एनटीए सीबीआयला सर्व प्रकारचे सहकार्य, आवश्यक कागदपत्रे आणि रेकॉर्ड उपलब्ध करून देणार आहे. या चौकशीतून पेपरफुटीचे धागेदोरे कोठपर्यंत पोहोचले आहेत, हे स्पष्ट होणार आहे.

नाशिक । प्रतिनिधी

देशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी निट परीक्षा यंदा मोठ्या वादात सापडली आहे. ३ मे रोजी झालेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेण्यात आल्यानंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. यामध्ये नाशिक आग्रस्थानी असल्याची चर्चा होत असून, याबाबत तपास सुरू आहे. नाशिक पोलिसांनी या प्रकरणी सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात मंगळवारी एका तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे. राजस्थान पोलिसांचे पथक येथे येणार आहे. ते येथे पोहोचल्यानंतर त्या तरुणाला त्यांच्या ताब्यात देण्यात येईल.

संशयिताने आपले केस कापले होते. त्यामुळे त्याची ओळख पटवण्यात अडचण येत होती. पण तांत्रिक विश्लेषण व इतर गोष्टींच्या मदतीने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. ▶▶ पान २ वर



# राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून तटकरे, पटेल यांना वगळले!

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची अंतिम यादी सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या यादीमध्ये पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि दिलीप वळसे–पाटील यांच्या नावांचा समावेश नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान, या सर्व प्रकारावर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी स्पष्टीकरण दिले असून ही एक तांत्रिक चूक असल्याचे म्हटले आहे.**

व्हायरल झालेल्या यादीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत मोठी खांदेपालट पाहायला मिळत आहे. यामध्ये प्रामुख्याने पवार कुटुंबातील पुढच्या पिढीला महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्याचे दिसत आहे. सुनेत्रा पवार: पत्रात त्यांचा उल्लेख राष्ट्रीय ▶▶ पान २ वर

# मोदी यांनी सर्वपक्षिय बैठक बोलवावी, घोषणांमुळे अस्वस्थेचे वातावरण–शरद पवार

पुणे । प्रतिनिधी

मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी काही घोषणा केल्या. त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग–व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब निश्चितच काळजी निर्माण करणारी आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधानांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी केली.



पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय–प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच पंतप्रधानांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये ▶▶ पान २ वर

# रूपाली चाकणकरांना एसआयटीनंतर आता ईडीचे समन्स



### ईडीच्या पुढील कारवाईकडे लक्ष

राज्यातील सध्याच्या राजकीय वातावरणात या प्रकरणाने मोठे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता आहे. केंद्रीय यंत्रणेने थेट या तपासात प्रवेश केल्यामुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे. चौकशीत ठोस पुरावे मिळाल्यास रूपाली चाकणकर यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई होऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमधील भोंदूबाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात प्रकरणाने आता मोठे वळण घेतले असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष तपास पथकाकडून नुकतीच त्यांची सविस्तर चौकशी करण्यात आल्या आहेत.

अशोक खरात याच्यावर मोठ्या प्रमाणात खंडणी उकळल्याचे गंभीर आरोप आहेत. तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, या कथित रॅकेटमधून ७० कोटी रुपयांहून ▶▶ पान २ वर

# बांगलादेश सीमेवर कुंपणासाठी बीएसएफला जमीन–मुख्यमंत्री

कोलकाता । वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमध्ये नव्याने स्थापन झालेल्या भाजप सरकारने पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांनी भारत–बांगला देश सीमेलगत कुंपण उभारण्यासाठी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) ला जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची घोषणा केली. पुढील ४५ दिवसांत ही जमीन केंद्रीय गृह मंत्रालयाकडे सुपूर्द केली जाईल, असे त्यांनी सांगितले. हावड्यातील नबन्ना सचिवालयात झालेल्या पहिल्या कॅबिनेट बैठकीनंतर मुख्यमंत्री अधिकारी यांनी निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले, राज्यातील अवैध घुसखोरी ▶▶ पान २ वर

# किरकोळ महागाईने गाठला १३ महिन्यांचा उच्चांक

## दागिने–जीवनावश्यक वस्तू महागल्या, सामान्यांच्या खिशाला झळ!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मंगळवारी जाहीर करण्यात आलेल्या सरकारी आकडेवारीनुसार, एप्रिल महिन्यात किरकोळ महागाई वाढून ३.४८ टक्क्यांवर पोहोचली. ही आकडेवारी १३ महिन्यांच्या उच्चांक आहे. प्रामुख्याने सोने–चांदीचे दागिने आणि स्वयंपाकघरातील काही वस्तूंच्या वाढलेल्या किमतींमुळे ही वाढ दिसून




आली. शहरी महागाई दर ३.११ टक्क्यांवरुन वाढून ३.१६ टक्क्यांवर पोहोचली असून ग्रामीण महागाई दर ३.६३ टक्क्यांवरुन वाढून ३.७४ टक्क्यांवर वर पोहोचली.

२०२४ हे आधारभूत वर्ष मानून मोजली जाणारी ग्राहक किंमत निर्देशांक आधारित महागाई मार्चमध्ये ३.४० टक्के, फेब्रुवारीमध्ये ३.२१ टक्के आणि जानेवारीमध्ये २.७४ टक्के इतकी होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) ▶▶ पान २ वर

# निट ने केले नीट : चूक यंत्रणेची शिक्षा मुलांना

▶▶ पान २ वर

बीड । प्रतिनिधी

**नुकत्याच तीन मे रोजी झालेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट परीक्षा पुन्हा एकदा पेपर फुटीच्या सावता मुळे रद्द करण्यात आली आहे अगोदरच परीक्षेची तयारी करताना दमछाक झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा रद्द करून नीट केली या सर्व प्रक्रियेत यंत्रणेची चूक असताना शिक्षा मात्र पालक आणि विद्यार्थ्यांना दिली जात आहे**

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेल्या नीट या परीक्षेची तयारी वर्षभरापासून विद्यार्थी करत होते तीन मे रोजी झालेली परीक्षा त्याचे काही मिळते ज्योती प्रश्नसंच व्हायरल झाले प्रामुख्याने तीन मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा केंद्राच्या यंत्रणेने रद्द केली आहे या प्रकरणी नाशिक मधील एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले तर याचे कनेक्शन लातूरकडे जुळत असल्याचे बोलले जात आहे या प्रकरणाची राजस्थान पोलिसांनी विशेष चौकशी सुरू केली असली तरी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देखील या प्रकरणाची दखलखेत यातील शंभरहून अधिक प्रश्न मिळते जुळते असल्याने अखेरी परीक्षा रद्द केली गेली विशेष म्हणजे गेल्या वर्षभरापासून विद्यार्थ्यांनी हजारो रुपये देऊन क्लासेस लावले होते शिवाय रात्र रात्र जागून अभ्यास केला परंतु पेपरच फुटल्यामुळे ही परीक्षा रद्द केली गेली ही चूक शासकीय यंत्रणेची आहे त्या यंत्रणेने




केलेल्या चुकीची शिक्षा विद्यार्थ्यांना मात्र भोगावे लागत आहे राजस्थानच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकाने दिलेल्या माहितीनुसार ४०० प्रश्नाचा एक संभाव्य प्रश्नसंच व्हायरल झाला होता त्यातील शंभरहून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारलेल्या प्रश्नाची तंतोतंत जुळणारे होते हा योगायोग होता की यामागे मोठे रॅकेट होते हा मोठा प्रश्न आहे परीक्षेबाबत शासन गांभीर्याने पाहत नसल्याचे हे दिसत आहे ही चूक शासकीय यंत्रणेची आहे मग शिक्षा पालक आणि विद्यार्थ्यांना कशामुळे आता पुन्हा परीक्षा होणार म्हटल्यावर पुन्हा अभ्यासाचा ताण विद्यार्थ्यावर आलाच परंतु ज्या ठिकाणी हे प्रश्नसंच बनवले होते त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांची चौकशी केली पाहिजे तरच हा प्रश्न निकाली निघेल यापूर्वीही अनेक असेच प्रकार घडले होते परंतु आता केंद्रीय पातळीवर होत असलेले या परीक्षेमध्ये पारदर्शकता येईल असे पालकांना वाटत होते मात्र तसे न होता येरे माझ्या मागच्या अशीच स्थिती यात झाली आहे प्रश्नसंच ▶▶ पान २ वर



# सुनील तटकरे यांनी घेतली शरद पवारांची भेट

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली आहे. मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी सुनील तटकरेंनी शरद पवारांची भेट घेतली. सुरू असलेल्या राष्ट्रवादीतील घडामोडी, सुनील तटकरे यांचे राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत नाव नसल्याच्या बातम्यानंतर ही भेट होत असल्याने त्याला महत्व ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### संजय कपूर मालमत्ता प्रकरणी कोर्ट संतप्त

नवी दिल्ली: ३० हजार कोटी रुपयांच्या वारसाहक्कावरून उद्योगपती संजय कपूर मालमत्ता वाद थांबण्याचे नाव घेत नाही. मंगळवारी (दि.१२) दुपारी संजय कपूर यांची आई राणी कपूर यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. रघुवंशी इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या १८ मे रोजी होणाऱ्या बोर्डाच्या बैठकीला स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे. ही बैठक म्हणजे न्यायालयाने दिलेल्या मध्यस्थीच्या आदेशाला बगल देण्याचा फसवा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर राणी कपूर यांच्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती पारडीवाला म्हणाले: आम्ही एका आखाड्यात उतरलो आहोत. या वादापुढे महाभारतही खूप लहान वाटेल. आम्ही या प्रकरणाची पाहणी करू.न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी गुरुवार, १४ मे रोजी निश्चित केली आहे.

### ऑपरेशन सिंदूरमध्ये चीन–पाकिस्तान युतीचा पर्दाफाश

नवी दिल्ली: भारतीय परराष्ट्र मंत्रालयान मंगळवारी ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानला मिळालेल्या चीनच्या पाठिंब्याबाबत एक मोठी माहिती दिली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, अलीकडेच आलेले ते सर्व अहवाल पूर्णपणे खरे आहेत, ज्यामध्ये ऑपरेशन सिंदूरच्या वेळी चीनने पाकिस्तानला मदत केल्याचा दावा करण्यात आला होता. भारत सरकारला ही बाब आधीपासूनच माहित होती आणि नवीन अहवाल फक्त त्या जुन्या माहितीवर शिक्कामोर्तब करतात. चीनच्या सरकारी माध्यमांनी स्वतः ही बाब मान्य केली आहे की, मे २०२५ मध्ये झालेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान बीजिंगने पाकिस्तानला तांत्रिक मदत दिली होती. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी मंगळवारी या विषयावर पत्रकार परिषदेत सविस्तर भाष्य केले. त्यांनी स्पष्ट केले की, चीनच्या मदतीचे अहवाल फक्त त्याच गोष्टीला पुष्टी देतात, याची भारताला आधीच माहिती होती.

### शाळा–मंदिरांजवळील दारूची दुकाने बंद करा

चेन्नईः तामीळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर एकापाठोपाठ एक निर्णयांचा धडाका सुरू केला आहे. थलपती विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हातात घेताच २०० युनिटपर्यंत वीज बिल माफ करण्याचा धडाकेबाज निर्णय घेतला होता. त्यानंतर आता दारूच्या दुकानावर त्यांनी कठोर निर्णय घेतला आहे. राज्यातील शाळा, मंदिरे, रुग्णालये आणि बस स्थानकांच्या ५०० मीटरच्या परिघात येणारी दारूची दुकाने तातडीने बंद करण्याचे आदेश मुख्यमंत्री विजय यांनी दिले आहेत. विजय यांच्या या निर्णयाचे सर्वच स्तरांवर कौतुक केले जात आहे. मुख्यमंत्री विजय यांनी फक्त महसुलाचा विचार न करता नव्या पिढीचे भविष्य आणि महिलांची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून पाऊल उचलले असल्याच्या प्रतिक्रिया लोकांमधून येत आहेत. या निर्णयामुळे शैक्षणिक आणि धार्मिक स्थळांचा परिसर आता मद्यमुक्त होणार असून, सर्वसामान्यांकडून या 'मास्टरस्ट्रोक'चे स्वागत होत आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१२ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९४.०० क्विंटल | १,८५५ | २,७२५ | २,२९३ |
| ज्वारी/हायब्रिड : १४४.०० क्विंटल | १,६९९ | ४,१०० | २,३९८ |
| मका/लोकल: २७.५० क्विंटल | १,८३१ | १,८५० | १,८४० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ७७.०० क्विंटल | १,८०० | २,५२१ | २,२५१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,१०१ | ५,१५० | ५,१२५ |

## अग्रलेख

# आव्हान अर्थसुरक्षेचे : राष्ट्रहित, वास्तव आणि तडजोडीची गरज

जागतिक अर्थकारणाच्या अस्थिर वादळात भारत पुन्हा एकदा एका निर्णायक वळणावर उभा आहे. पश्चिम आशियातील तणाव, इराणसंदर्भातील युद्धजन्य परिस्थिती आणि त्यामुळे भडकलेले कच्च्या तेलाचे दर यांचा परिणाम केवळ आंतरराष्ट्रीय बाजारापुरता मर्यादित राहत नाही; त्याचे थेट प्रतिबिंब भारताच्या अर्थव्यवस्थेवर उमटते. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि आयात-आधारित ऊर्जाव्यवस्थेच्या देशासाठी ही परिस्थिती धोक्याची घंटा ठरते. अशा पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधन बचत, सोन्याची खरेदी टाळणे, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे, कारपूलिंग आणि वर्क फ्रॉम होमला प्रोत्साहन देणे यासारख्या सूचना केल्या. या आवाहनाने राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

सरकारच्या मते हे राष्ट्रहिताचे पाऊल आहे. तेल आणि सोन्याच्या आयातीमुळे देशाच्या परकीय चलन साठ्यावर प्रचंड ताण येतो. भारत जवळपास ८५ ते ८९ टक्के कच्चे तेल आयात करतो. जागतिक बाजारात तेलाचे दर वाढले की त्याचा परिणाम थेट भारताच्या आयात बिलावर होतो. त्याचप्रमाणे भारतात सोन्याची मागणी सांस्कृतिक, सामाजिक आणि गुंतवणुकीच्या कारणांमुळे प्रचंड आहे. मागील आर्थिक वर्षात सोन्याची आयात तब्बल ७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचल्याचे आकडे सांगतात. तेल आणि सोन्यावरील अवलंबित्व कमी झाले तर रुपयावरील दबाव कमी होऊ शकतो, महागाई नियंत्रणात राहू शकते आणि विदेशी चलन साठा अधिक सुरक्षित राहू शकतो, असा अर्थतज्ज्ञांचा युक्तिवाद आहे. परंतु प्रश्न केवळ आर्थिक गणितांचा नाही. भारतात सोने हे केवळ धातू नाही; ते सुरक्षित गुंतवणूक, सामाजिक प्रतिष्ठा, भावनिक परंपरा आणि स्त्रीसुरक्षेचे प्रतीक मानले जाते. ग्रामीण भारतात आजही सोन्याकडे 'आर्थिक विमा' म्हणून पाहिले जाते. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि पारंपरिक व्यवहारांमध्ये सोन्याचे महत्त्व अत्यंत खोलवर रुजलेले आहे. त्यामुळे ''एक वर्ष सोन्याची खरेदी टाळा'' हे आवाहन व्यवहार्यतेच्या कसोटीवर कितपत टिकेल, हा प्रश्न स्वाभाविक आहे. याच ठिकाणी सरकारसमोर विश्वासार्हतेचे आव्हान उभे राहते. सामान्य नागरिकांकडून त्यागाची अपेक्षा करताना सरकारच्या धोरणांमध्ये सुसंगतता असणे आवश्यक ठरते. इंधन दर सातत्याने वाढत असताना, कररचना कायम ठेवली जात असताना किंवा पर्यायी ऊर्जाव्यवस्थेची उपलब्धता मर्यादित असताना नागरिकांनी केवळ राष्ट्रभक्तीच्या भावनेतून दीर्घकालीन त्याग करावा, अशी अपेक्षा वास्तववादी ठरत नाही. कारपूलिंग, मेट्रो किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे आवाहन योग्य असले तरी देशातील बहुतांश भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अद्याप पुरेशी सक्षम नाही. ग्रामीण भारतात तर अनेक पर्याय उपलब्धच नाहीत. विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारवर हल्लाबोल करणे अपेक्षितच होते. काँग्रेससह विविध पक्षांनी हे सरकारच्या आर्थिक अपयशाचे लक्षण असल्याचे म्हटले. महागाई, बेरोजगारी आणि रुपयावरील दबाव यासाठी केंद्र सरकारलाच जबाबदार धरले गेले. काही अंशी ही टीका रास्तही आहे. कारण आर्थिक व्यवस्थापनात दूरदृष्टी आणि तयारी यांची कसोटी संकटकाळातच लागते. जर देशाला वारंवार आयात-आधारित संकटांना सामोरे जावे लागत असेल, तर ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दिशेने गेल्या दशकात कितपत भक्कम पावले उचलली गेली, हा प्रश्न उपस्थित होतो. मात्र विरोधकांनीही केवळ राजकीय संधी म्हणून या प्रश्नाकडे पाहणे योग्य नाही. कारण तेलदरवाढ आणि जागतिक आर्थिक अस्थिरता ही कोणत्याही एका सरकारपुरती मर्यादित समस्या नसते. भारतासारख्या देशात राष्ट्रीय आर्थिक सुरक्षेचे प्रश्न हे सत्ताधारी आणि विरोधक यांच्या पलीकडे जाऊन हाताळावे लागतात. सरकारचे आवाहन पूर्णतः नाकारणे जितके चुकीचे, तितकेच जनतेच्या वास्तविक अडचणींकडे दुर्लक्ष करून केवळ भावनिक राष्ट्रवादावर भर देणेही धोकादायक ठरू शकते. या संपूर्ण चर्चेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे ''तात्पुरत्या उपाययोजना'' आणि ''दीर्घकालीन धोरण'' यातील फरक. इंधनाचा संयमी वापर, सोन्याच्या खरेदीवर मर्यादा किंवा अनावश्यक खर्च टाळणे हे अल्पकालीन उपाय असू शकतात. पण दीर्घकालीन उत्तर त्यापेक्षा वेगळे आहे. भारताला खऱ्या अर्थाने ऊर्जा आत्मनिर्भर बनवायचे असेल तर इलेक्ट्रिक वाहनांचे स्वस्त आणि व्यापक जाळे उभे करावे लागेल. सौर, पवन आणि हरित ऊर्जेवरील गुंतवणूक प्रचंड वाढवावी लागेल. बॅटरी उत्पादन, हरित हायड्रोजन, सार्वजनिक वाहतूक आणि स्थानिक उत्पादन क्षमता यांना गती द्यावी लागेल. त्याचप्रमाणे सोन्याच्या पुनर्वापराला प्रोत्साहन, गोल्ड बाँड्ससारख्या पर्यायांना विश्वासार्हता आणि आर्थिक साक्षरता वाढवण्याची आवश्यकता आहे.

या आवाहनाचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे आर्थिक जागरूकतेची चर्चा मुख्य प्रवाहात आली आहे. सामान्यतः तेल आणि सोन्याच्या आयातीचा परकीय चलन साठ्यावर होणारा परिणाम ही अर्थतज्ज्ञांच्या चर्चेतील बाब मानली जात होती. पण आता ती थेट सामान्य नागरिकांच्या जीवनशैलीशी जोडली जात आहे. हा बदल सकारात्मक आहे. कारण जागतिक संकटाच्या काळात नागरिकांचा सहभाग आणि आर्थिक जबाबदारी महत्त्वाची असते. तथापि, केवळ आवाहनांनी परिवर्तन घडत नाही. जनतेला त्यागासाठी प्रेरित करायचे असेल तर सरकारनेही काही ठोस संदेश द्यावे लागतील. इंधनावरील करांमध्ये लवचिकता, सार्वजनिक वाहतूक सवलती, इलेक्ट्रिक वाहनांवरील प्रोत्साहन, स्थानिक उत्पादनाला चालना आणि धोरणात्मक पारदर्शकता या गोष्टींची जोड आवश्यक आहे. अन्यथा आवाहन आणि वास्तव यातली दरी अधिक वाढेल.

भारताची लोकशाही ही मतभिन्नतेवर उभी आहे. त्यामुळे या विषयावर सर्वांचे मत एकसारखे असणे शक्य नाही. पण राष्ट्रीय आर्थिक सुरक्षेच्या प्रश्नांवर काही मूलभूत सहमती निर्माण होणे आवश्यक आहे. विरोधकांनी केवळ विरोधासाठी विरोध करू नये आणि सरकारनेही टीकेला राष्ट्रविरोधाशी जोडू नये. सर्वसंमती हवी असेल तर तडजोड, संवाद आणि वास्तववादी धोरणे आवश्यक असतात. निवडणूक मोडमध्ये अशा गंभीर आर्थिक प्रश्नांची प्रभावी सोडवणूक होत नाही. पंतप्रधानांचे हे आवाहन यशस्वी होईल की नाही, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईल. पण एक गोष्ट निश्चित आहे, या चर्चेने देशाला एक महत्त्वाचा आरसा दाखवला आहे. आत्मनिर्भरतेची भाषा केवळ घोषणांमधून नव्हे, तर जीवनशैली, धोरणे आणि आर्थिक शिस्तीतून सिद्ध करावी लागते. आणि त्यासाठी सरकार, विरोधक आणि जनता या तिन्ही घटकांना आपापली जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे.



मुंबई - मुंबई गुन्हे प्रतिबंधक शाखेचे पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे साहेब यांची अनिकेत राऊत यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

# जालना साठी आलेला युरिया खताची बाहेर जिल्ह्यात विक्री

### खताची टंचाई सांगून शेतकऱ्यांची कृषीसेवा केंद्राकडून लूट

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**सावंगी तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्र चालकांकडून युरिया खताची कृत्रिम टंचाई व लिंकिंग सांगून देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. मात्र, शेतकऱ्याला येणारा युरिया हा पर जिल्ह्यात विक्री सर्रास केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे.**

यावर्षीचा हंगाम शेतकऱ्याची लगबग सुरु असताना या भागात शेतकरी आपल्या ऊसाला व पुढील हंगामास लागणाऱ्या युरिया खताची मागणी करतो. मात्र, येथील कृषी सेवा केंद्र चालक कुठल्या शेतकऱ्याला युरिया न देता तो युरिया जास्त भावाने दुसऱ्या जिल्ह्यात विक्री केला जातो व शेतकऱ्यांनी जर युरिया खताची मागणी केली तर त्याला लिंकिंग खत नावाखाली एक दोन बॅग दिला जातात मात्र तिर्थपुरी घनसावंगी रोडवरील एक खाजगी ट्रक मधून दुसऱ्या ट्रकमध्ये युरियाच्या बॅग पर जिल्ह्यात पाठवल्या जात असल्याचे आढळून आले खरीप हंगामाच्या अगोदरच जर कृषी सेवा केंद्राकडून जर अशी परिस्थिती निर्माण केली जात असेल तर या परिस्थितीवर संबंधित अधिकाऱ्याने तात्काळ लक्ष देऊन वेळीच कार्यवाही करावी व शेतकऱ्यांना खत मिळावे यासाठी शासनाने उपाययोजना कराव्यात. शासन शेतकऱ्याला सबसिडी अंतर्गत युरियाची समांतर वाटप केले जाते. मात्र, येथील कृषी सेवा केंद्रांकडून शेतकऱ्याला युरिया देत नसून तो दुसऱ्या जिल्ह्यात विकत असल्याने त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी शेतकरी यांच्याकडून होत आहे.

## प्रयागबाई शिराळे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

**भाजपाचे नेते नवनाथ शिराळे यांच्या चुलती व सखाराम शिराळे यांच्या मातोश्री प्रयागाबाई शिराळे यांचे आज दुःखद निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ९५ वर्षे होते.**



सखाराम शिराळे यांच्या मातोश्री प्रयागाबाई यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांचा अंत्यविधी १३/०५/२०२६सकाळी ९ वाजता भगवान बाबा स्मशानभूमी बार्शी रोड बीड. येथे होईल. त्यासखाराम भानुदास शिराळे यांच्या आई होत्या तर नवनाथ अण्णा शिराळे यांची चुलती होती.

## ठेवीदारांच्या पैसे परत मिळण्यासाठी मर्चंटस् बँके समोर अर्धनग्न उपोषण करणार

जालना । प्रतिनिधी



**कोट्यावधी रुपयांच्या घोटाळ्यांमुळे कष्टाची रक्कम परत मिळेल की नाही? या विवंचनेत ठेवीदार, खातेदार सभासदांच्या न्याय हक्कासाठी तसेच घोटाळ्याची सीआयडी मार्फत चौकशी करून दोषींवर मोक्का लावण्यात यावा, दोषी संचालकांची संपत्ती जप्त करण्यात यावी,कोट्यावधी रुपयांचे घोटाळे होत असतांना कर्तव्यात कसूर करुन दुर्लक्ष करणारे बँकेचे दोषी संचालक,आर.बी.आय.नियुक्त व्यवस्थापन समितीवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागण्यांसाठी मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस्? को-ऑपरेटिव्ह बँकेसमोर अर्धनग्न उपोषण करणार असल्याचा इशारा रवी अग्रवाल यांनी दिला आहे.**

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात रवी अग्रवाल यांनी म्हटले आहे की, नियमबाह्य कोट्यावधीचे कर्ज वाटप, वसुलीतील अनियमितता, बँकेची डबघाईस आलेली आर्थिक स्थिती लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने महिनाभरापूर्वी मर्चंट बँकेच्या व्यवहारावर बंधने आणली.पोलीस प्रशासनाने घोटाळ्यातील काही आरोपींना पकडले, त्यांच्याकडून चौकशी सुरू असली तरी झारीतील शुक्राचार्य अद्याप पर्यंत मोकळे आहेत.असे सांगून रवी अग्रवाल म्हणाले, घोटाळ्याचा तपास पूर्ण होईपर्यंत संचालक, अधिकारी यांना निलंबित करून त्यांचे अधिकार काढण्यात यावे, तसेच बँकेत येण्यापासून त्यांना प्रतिबंध करावे, बँकेवर तात्काळ प्रशासक नेमावा, ठेवीदार खातेदारांना संचालक, अधिकारी यांनी स्वतःच्या खात्यातील सहा महिन्यांनंतरचा सुरक्षा धनादेश द्यावा, दोषी संचालकांची संपत्ती जप्त करण्यात यावी, बँकेत ठेवी किती आहेत? सोनेतारण, व्यावसायिक,वाहन, गृह कर्जे किती वाटप करण्यात आली.पिग्मी,बचत, चालू खात्यांतील रक्कम किती जमा आहे याची माहिती सार्वजनिक करावी, घोटाळ्याची सीआयडी मार्फत चौकशी करून दोषींवर मोक्का लावण्यात यावा, कोट्यावधी रुपयांचे घोटाळे होत असतांना कर्तव्यात कसूर करुन दुर्लक्ष करणाऱ्या बँकेच्या व्यवस्थापन समितीवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा,घोटाळ्यात जी नावे समोर आली, त्यांना अटक करावी,१५ दिवसांची पोलीस कोठडी घेऊन घोटाळ्याची विचारपूस करावी आदी मागण्या रवी अग्रवाल यांनी केल्या आहेत.

# भर उन्हामध्ये जिल्हाधिकारी यांनी बळीराजा शेत पाणंद रस्त्यांची केली पाहणी

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**भर उन्हामध्ये जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेती पाणंद रस्त्याची केली पाहणी . राज्य शासनाच्या ''मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना'' अंतर्गत जिल्ह्यातील शेत व पाणंद रस्त्यांची कामे नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना व घनसावंगी तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये जालना तालुक्यातील लोंढ्याचीवाडी तसेच घनसावंगी तालुक्यातील राणी उचेंगाव, राजेगाव, वडीरामसगाव आणि बाचेगाव येथील प्रस्तावित शेत/पाणंद रस्त्यांची त्यांनी पाहणी केली. यावेळी संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून प्रस्तावित रस्त्यांची सविस्तर माहिती घेतली.**



पाहणीदरम्यान रस्त्यांची उपलब्ध जागा, अतिक्रमण स्थिती, मोजणी प्रक्रिया, तांत्रिक बाबी तसेच कामांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी बारमाही सुविधा उपलब्ध होणे, शेतीपर्यंत कृषी यंत्रसामग्री पोहोचण्यास सुलभता निर्माण होणे तसेच ग्रामीण भागातील शेती रस्ते सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील प्रस्तावित कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. ज्या ठिकाणी अतिक्रमण अथवा अन्य तांत्रिक अडचणी आहेत, त्या तातडीने निकाली काढून कामांना गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. रस्त्यांच्या कामांमध्ये गुणवत्ता राखणे, मुरूम व खडी दबाई योग्य प्रकारे करणे तसेच रस्त्यांचा टिकाऊपणा सुनिश्चित करण्यावर विशेष भर द्यावा. तसेच मौजे लोंढ्याचीवाडी (ता. जालना) तसेच राणी उचेंगाव, राजेगाव, वडीरामसगाव आणि बाचेगाव (ता. घनसावंगी) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अपूर्ण कामांचाही आढावा घेत, अपूर्ण कामांबाबत नियमानुसार कार्यवाही करून ती तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या. यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्रीमती मनीषा दांडगे, तहसीलदार घनसावंगी रमेश पागोटे, प्रभारी तहसीलदार जालना राजू निहाळ, नायब तहसीलदार शैलेश राजमाने, नायब तहसीलदार (रोहयो) डॉ. नीलम लुणावत, कार्यक्रम व्यवस्थापक सतीश देवढे यांच्यासह संबंधित गावांचे तलाठी व ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.

## पान १ वरून...

### दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा

नियमित कर्जदार शेतकऱ्यांची माहिती बँकांनी सहकार विभागाकडे पाठविली आहे. आता सरकारकडून कर्जमाफीचे अंतिम निकष निश्चित केले जात असून, त्यानुसार पात्र शेतकऱ्यांची यादी निश्चित केली जाणार आहे. दरम्यान, कर्जमाफीच्या अभ्यासासाठी राज्य सरकारने प्रविणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने एप्रिल महिन्यातच आपला अहवाल सरकारकडे सादर केला आहे. त्यानंतर सहकार विभागाने १ एप्रिल २०२२ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील शेतकऱ्यांच्या कर्जाची माहिती सरकारला दिली आहे. सरकारच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पात्र शेतकऱ्यांना ३० जूनपूर्वी कर्जमाफीचा लाभ देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कर्जमाफीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बचत खात्यात जमा केली जाणार असून, त्यानंतर संबंधित कर्जाची परतफेड बँकांना केली जाणार आहे.

--------------

### राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून

अध्यक्ष म्हणून करण्यात आला आहे. पार्थ पवार यांची जनरल सेक्रेटरी (महासचिव) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर जय पवार यांना नॅशनल सेक्रेटरी (राष्ट्रीय सचिव) म्हणून स्थान देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाला सादर केल्याचे सांगण्यात येणाऱ्या या यादीतून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि दिलीप वळसे-पाटील यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांची नावे गायब आहेत. यापूर्वी सुनील तटकरे यांच्यावर महासचिव पदाची जबाबदारी होती, मात्र नव्या यादीत त्यांचे नाव नसल्याने पक्षात अंतर्गत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यादी व्हायरल झाल्यानंतर आणि माध्यमांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरू झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी तातडीने पोस्टच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ''राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची एक यादी सध्या प्रसारमाध्यमं आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फिरत आहे. मात्र, त्या यादीमध्ये काही तांत्रिक चुका झाल्या आहेत. या चुका लवकरच दुरुस्त करून पक्षाची अधिकृत आणि सुधारित यादी जाहीर करण्यात येईल,'' असे सुनेत्रा पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. सुनेत्रा पवार यांच्या स्वाक्षरीने २९ तारखेला केंद्रीय निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवण्यात आले होते. या पत्राच्या आधारेच ही यादी चर्चेत आली होती. मात्र, आता स्वतः अध्यक्षांनीच यात त्रुटी असल्याचे मान्य केल्यामुळे, सुधारित यादीत कोणत्या नेत्यांना स्थान मिळते आणि कुणाचा पत्ता कट होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------

### 'नीट' प्रश्नपत्रिका फुटण्यामागे नाशिक

दुसरीकडे, सुत्रांनी सदर आरोपी बीएएमएसचे शिक्षण घेत असल्याचा दावा केला आहे. तसेच त्याची मेडिकल काउन्सलिंग एजन्सी असल्याचीही माहिती मिळत आहे. यातील पेपर हे नाशिकमधूनच प्रिंट करण्यात आले होते, असाही संशय व्यक्त केला जात आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, नाशिकमध्ये बाहेर पडलेली प्रश्नपत्रिका पुढे हरियाणात पोहोचवण्यात आली. हरियाणामध्ये त्या प्रश्नपत्रिकेचे दहा वेगवेगळे सेट तयार करण्यात आल्याचे समोर आले आहे. यानंतर हे पेपर बिहार, आंध्र प्रदेश तसेच जम्मू-काश्मीरपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक माहिती तपासात पुढे आली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे परीक्षा प्रक्रियेत सहभागी असलेल्या संस्था, एजन्सी आणि सुरक्षा यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पेपर लीक होण्याची साखळी इतक्या मोठ्या प्रमाणात कशी कार्यरत होती, याचा शोध आता केंद्रीय तपास यंत्रणा घेत आहेत. या प्रकरणाचा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे म्हणजेच सीबीआयकडे सोपवण्यात आला आहे. तपासात आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, जयपूरमधून अटक करण्यात आलेला मनीष नावाचा संशयित या संपूर्ण पेपरफुटीचा सूत्रधार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तपास अधिका-यांच्या मते, प्रश्नपत्रिका अधिकृतरीत्या छापली जाण्यापूर्वीच संभाव्य प्रश्नांची माहिती त्याने मिळवली होती. त्यानंतर संगनमताने प्रश्नपत्रिका बाहेर काढून ती विविध राज्यांमध्ये पोहोचवण्यात आल्याची शक्यता तपासली जात आहे. या संपूर्ण नेटवर्कमध्ये आणखी किती जण सहभागी आहेत, याचाही शोध सीबीआय घेत आहे.

**गुन्हेगारांना अभय मिळत असल्यानेच पेपर लिक - हर्षवर्धन सपकाळ**

भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात व अनेक राज्यात आल्यापासून गुन्हेगारीने डोके वर काढले असून शिक्षण क्षेत्रातही माफियाराजचा धुडगुस सुरु आहे. भाजपा सरकारला एक परिक्षाही सुरळीत पार पाडता येत नाही अशी अवस्था झाली. निट चा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याची नामुष्की ओढवली आहे. भाजपाच्या राजवटीत गुन्हेगारांना अभय मिळत असल्यानेच पेपर लिक करणारे माफिया मोकाट सुटलेत. नीट पेपर लिक प्रकरणी राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक अभिषेक सिंह यांची हकालपट्टी करून अटक करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

-------------

### रूपाली चाकणकरांना एसआयटीनंतर

अधिक रकमेची उलाढाल झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या पैशांचे व्यवहार लपवण्यासाठी अनेक बेनामी बँक खात्यांचा वापर करण्यात आल्याचेही समोर आले आहे. या आर्थिक व्यवहारांशी संबंधित काही धागेदोरे रूपाली चाकणकर यांच्यापर्यंत पोहोचल्याने तपास यंत्रणांनी त्यांच्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. या व्यवहारांमध्ये त्यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध होता का, याचा आता सखोल तपास सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी विशेष तपास पथकाने नाशिकमध्ये रूपाली चाकणकर यांची साडेपाच तास चौकशी केली होती. या चौकशीदरम्यान विविध कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. काही आर्थिक व्यवहार, संस्थांशी संबंधित नोंदी तसेच संपर्कांची माहिती तपास अधिका-यांनी पडताळून पाहिल्याचे सांगितले जात आहे. एसआयटी चौकशीनंतर लगेचच ईडीने हालचाली सुरू केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. आता मनी लाँड्रिंग, आर्थिक गैरव्यवहार आणि पैशांचा बेकायदेशीर वापर या सर्व बाबींवर स्वतंत्र तपास केला जाणार असल्याची चर्चा आहे. तपास यंत्रणांच्या रडारवर 'शिवनिका' नावाची संस्था देखील आली आहे. या संस्थेमधील रूपाली चाकणकर यांच्या भूमिकेची माहिती तपासली जात आहे. अशोक खरातने कथितरीत्या गोळा केलेल्या पैशांचे व्यवहार या संस्थेमार्फत झाले का, तसेच आर्थिक व्यवहार लपवण्यासाठी काही मदत करण्यात आली का, याचा तपास सुरू आहे. याशिवाय, या व्यवहारांचे धागेदोरे महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यांपर्यंत पोहोचतात का, याचाही शोध घेतला जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

-------------

### मोदी यांनी सर्वपक्षिय बैठक बोलवावी,

विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका असल्याचे सांगितले. पंतप्रधान महोदयांचा आदेश शीर्ष मानून आपणही आपल्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करावी, फक्त एक गाडी आणि एक अंगरक्षक देण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी केली. आखाती देशातील युद्धामुळे आपल्या देशावर भविष्यात उद्भवणारे संकट टाळण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसर करण्याचे आवाहन केले होते. यावर आता विविध मान्यवरांनी प्रतिक्रिया दिली आहे. जयंतराव पाटील यांनीही या आवाहनावर प्रतिक्रिया दिली आहे. जयंत पाटील म्हणाले की, देशाच्या पंतप्रधानांनी केलेले प्रत्येक आवाहन मध्यमवर्गीयांनी कर्तव्य म्हणून पाळले. थाळ्या वाजवायला सांगितल्या वाजवल्या. दिवे लावायला सांगितले तेही लावले. आता युद्धजन्य परिस्थितीत पेट्रोल, डिझेल आणि गॅस कमी वापरण्याचे आवाहन पंतप्रधान महोदयांनी केले आहे. मध्यमवर्गासाठी काटकसर ही काही नवी गोष्ट नाही. त्यामुळे कर्तव्य म्हणून याही वेळेला ते साथ देतीलच. पण २०-३० गाड्यांचा ताफा वापरणाऱ्या मंत्र्यांचे काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. आपल्या राज्यात मुख्यमंत्र्यांपासून मंत्री, अधिकारी आणि हल्ली तर सत्ताधारी पक्षाचे आमदार डझनभर गाड्यांचा ताफा आणि सुरक्षा घेऊन फिरतात. प्रधानमंत्री महोदयांचा आदेश शीर्ष मानून आपणही आपल्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करावी, फक्त एक गाडी आणि एक अंगरक्षक देण्यात यावा अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मध्यमवर्ग त्याग करायला तयार आहेच पण सत्ताधाऱ्यांनीही ''राष्ट्र प्रथम'' हे धोरण कृतीत उतरवावे असेही ते म्हणाले.

------------

### किरकोळ महागाईने गाठला

जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, अन्नधान्य गटातील महागाई एप्रिलमध्ये ४.२० टक्के इतकी नोंदवली गेली; जी मागील महिन्यात ३.८७ टक्के इतकी होती. सर्वाधिक महागाई चांदीच्या दागिन्यांमध्ये (१४४.३४ टक्के) दिसून आली; त्यानंतर नारळ-सुके खोबरे (४४.५५ टक्के), सोने, हिरे व प्लॅटिनमचे दागिने (४०.७२ टक्के), टोमॅटो (३५.२८ टक्के) आणि फुलकोबी (२५.५८ टक्के) यांचा क्रमांक लागला. दुसरीकडे, बटाटा, कांदा, मोटार कार व जीप, वाटाणा आणि वातानुकूलित यंत्रे (एअर-कंडिशनर्स) यांच्या किमतींमध्ये मात्र घट झाल्याचे आकडेवारीवरून दिसून आले.

----------

### बांगलादेश सीमेवर कुंपणासाठी

रोखण्यासाठी सीमा सुरक्षा अधिक मजबूत केली जाणार आहे. पूर्वीच्या तृणमूल काँग्रेस सरकारने भारतीय न्यायसंहिता (बीएनएस) लागू केली नव्हती. आता राज्यात नवीन फौजदारी कायदे तत्काळ प्रभावाने लागू करण्यात येणार आहेत.

--------------

### सुनील तटकरे यांनी

प्राप्त झाले आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर सुनील तटकरेंनी शरद पवारांची घेतलेली ही पहिलीच भेट असल्याचे सांगितले जात आहे. एकीकडे राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असताना त्याला सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांचा विरोध असल्याच्या बातम्या समोर येत होत्या. त्यानंतर मंगळवारी सुनील तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतली. शरद पवार साहेबांची तब्येत गेली काही दिवस ठिक नव्हती. त्यामुळे त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मी त्यांची वेळ मागितली होती. साहेबांना वेळ होती, त्यामुळे मी त्यांना भेटायला आलो असल्याची प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली. शरद पवारांच्या भेटीमागे कोणतेही राजकीय कारण नाही, कोणतेही राजकारण नाही, असे सुनील तटकरे म्हणाले. पवार साहेबांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेट घेतल्याचा दावा जरी सुनील तटकरे यांनी केला असला तरी या भेटीच्या टायमिंगमुळे मात्र त्याची चर्चा सुरू आहे.

--------------

### निट ने केले नीट : चूक

व्हायरल झाला मात्र यामध्ये देशभरातून परीक्षा देणारे लाखो विद्यार्थ्यांची चूक काय नीट परीक्षेचे टेन्शन घेऊन अगोदरच विद्यार्थी नीट झालेले असताना आता पुन्हा त्यांचे टेन्शन वाढले आहे चूक यंत्रणेची शिक्षा मात्र विद्यार्थ्यांना अशी गत नीट परीक्षेची झाली आहे नुकत्याच झालेल्या तीन मे रोजीच्या नीट परीक्षा रद्द झाल्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमधून मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. १३ मे २०२६



## थोडक्यात



### मुप्टा बीड जिल्हा वतीने गुणवंत विद्यार्थी अभिवादन जावळे यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

एसएससी परीक्षा २०२६ मध्ये चि. अभिवादन शशिकांत जावळे याने ८२.२० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल मुप्टा बीड जिल्हा वतीने त्याचा यथोचित सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हाध्यक्ष (मा.) प्रविण तरकसे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, प्रा. सुनील मोरे, डॉ. शशिकांत गायकवाड, प्रा. नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी चि. अभिवादन जावळे याचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याच्या मेहनत, जिद्द व चिकाटीमुळे हे यश मिळाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त करण्यात आले.

### प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांच्या मुलाखतीचे आज प्रसारण

बीड । प्रतिनिधी



क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षा निमित्त शासन स्तरावर आणि संस्था तसेच व्यक्ती स्तरावर वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. महात्मा फुले यांचे विचारांचा प्रचार आणि प्रसार व्हावा हा हेतू आहे. याच निमित्ताने आज(१३मे)बीड आकाशवाणी केंद्रावर सकाळी अकरा वाजता प्रासंगिक या सदरामध्ये फुले विचार आणि वाङ्मयाचे अभ्यासक प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. सदर मुलाखत ही आकाशवाणी केंद्राचे सीनियर निवेदक श्री गोपाळ ठाकूर यांनी घेतली आहे.सदर मुलाखत दोन भागात असून पूर्वार्ध आज तारीख आज रोजी प्रसारित होणार आहे आणि उत्तरार्ध हा दिनांक २० मे रोजी सकाळी प्रसारित होणार आहे. श्रोत्यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सय्यद समीया दहावीच्या परीक्षेत यश

पाटोदा । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध विधिज्ञ अड अशरफ यांची मुलगी सय्यद समिया अशरफ यांने झालेल्या दहावीच्या परीक्षेत ९१.६० गुण घेत पाटोदा येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल या शाळेत तिसरा क्रमांक घेतला आहे या या यशाच्या अनुषंगाने शाळेमार्फत विशेष प्राविण्य मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यात सय्यद समीया हीचाही सत्कार करण्यात आला. सय्यद समीया हिच्या यशाबद्दल सर्व मित्र परिवार व नातेवाईकांनी त्याला पुढील आयुष्यासाठी अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



# 'मकोका'मधील फरार आरोपीला पोलिसांनी सिनेस्टाईलने केली अटक

बीड । प्रतिनिधी

**बीड शहर आणि स्थानिक गुन्हे शाखेने एका संयुक्त कारवाईत 'मकोका' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असलेल्या आणि गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेल्या आठवले गँगच्या प्रमुख आरोपीला जेरबंद केले आहे. आशिष शामराव आठवले असे या अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला सिनेस्टाईल पाठलाग करून ताब्यात घेतले.**



आरोपी आशिष आठवले हा पेठ बीड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मकोकाच्या गुन्ह्यात गेल्या काही काळापासून फरार होता. तो सतत आपली ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी होत होता. मात्र, काल रात्री ११:०० वाजताच्या सुमारास त्याने बीड शहरातील 'समर्थ बिअर शॉपी' येथे उधारीने बिअर मागितली. चालकाने उधारी देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या आठवलेने आपल्या जवळील गावठी पिस्तूलने गोळीबार केला. या हल्ल्यात फिर्यादी जखमी झाले असून, याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गोळीबाराच्या घटनेनंतर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक शिवाजी बंटेवाड आणि बीड शहर पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या पथकांनी आरोपीचा शोध सुरू केला. तो कबाडगल्ली भागातून मोटारसायकलवरून जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहून पळून जाणाऱ्या आरोपीला पोलीस अंमलदार अश्पाक सय्यद यांनी मिठी मारून पकडले. त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल, एक जिवंत काडतूस आणि रिकामी पुंगळी जप्त करण्यात आली आहे.

या पथकाने केली कामगिरी

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शीतलकुमार बल्लाळ, उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, अंमलदार अश्पाक सय्यद आणि त्यांच्या पथकाने फत्ते केली. या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारी जगतात मोठी खळबळ उडाली आहे.

## भारुड, पोवाडा आणि लोकसंगीतातून अमृत २.० योजनेची प्रभावी जनजागृती

आष्टी । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी अमृत २.० योजनेअंतर्गत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा लाभ घराघरांपर्यंत पोहोचविण्यासाठी लोककलेच्या माध्यमातून आष्टी शहरात प्रभावी जनजागृती करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित या कार्यक्रमात भारुड, पोवाडा आणि लोकसंगीताच्या सुरेल सादरीकरणातून नागरिकांना शुद्ध पाण्याचे महत्त्व आणि शासनाच्या योजनांची माहिती देण्यात आली.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुमित्रा ताई पवार,यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा, जलसंवर्धन



**आष्टी शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात बहारदार लोककला सादरीकरण; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

आणि वृक्षलागवडीची कामे करण्यात आली आहेत. या योजनांचा मोठा लाभ ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना होत असून, प्रत्येकाच्या घरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण होत आहे.

आष्टी शहरात आणि परिसरात या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार सुरेश आण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली जलजीवन मिशन व अमृत २.० योजनेची कामे वेगाने पूर्ण करण्यात आली आहेत. यामुळे हजारो नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. या जनजागृती कार्यक्रमात प्रा. रुपेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील कलाकारांनी अत्यंत प्रभावी सादरीकरण केले. त्यामध्ये प्रशांत गीते, शांताराम निकम, नारायण पवार, अरुण जोगदंड, नंदू वाघमारे, सचिन शिंदे, जितेंद्र भिसे, ओमकार धुतडमल यांनी सहभाग घेतला. लोककलेच्या सशक्त माध्यमातून शासनाच्या योजनांचा संदेश नागरिकांच्या मनापर्यंत पोहोचविण्यात कलाकारांना यश आले. यावेळी उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, पाणीपुरवठा सभापती किशोर झरेकर, नगरसेवक बाळासाहेब घोडके, विजय धोंडे, बबलू देशमुख, पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार शरद रेडेकर, दुर्गेश कुलकर्णी, विनय पठधरीया, धनंजय देशपांडे, गणेश घुले, बाळासाहेब माने, ऋषी बोडखे तसेच इतर मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.लोककलेच्या माध्यमातून शासनाच्या योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचू शकतात, याचे उत्तम उदाहरण या कार्यक्रमातून पाहायला मिळाले. अमृत २.० योजनेमुळे प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचविण्याचे स्वप्न साकार होत असून, नागरिकांनीही या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत केले.

पान ६ वरुन...

### हा प्रामाणिक विद्यार्थ्यांचा नाही

गैरप्रकार, पेपर लीक किंवा सुरक्षेतील त्रुटी समोर येतात तेव्हा केवळ परीक्षा रद्द होत नाही, तर गुणवत्तेवरचा विश्वास हादरतो. प्रामाणिक विद्यार्थ्यांना अन्याय सहन करावा लागतो. मानसिक ताण, नैराश्य आणि असुरक्षिततेची भावना वाढते. यां प्रकारामुळे जर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तर याला कोण जबाबदार राहतील असा संतप्त सवाल डॉ इंगोले यांनी यावेळी केला.

यावेळी डॉ इंगोले यांनी २०२४ मध्येही असाच प्रकार घडला होता तरीही शासकीय यंत्रणा सावध नव्हत्या ही दुर्दैवी बाब आहे.

यावर अधिक भाष्य करताना डॉ इंगोले यांनी २२ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांसाठी एकाच दिवशी, एकाच पद्धतीने, अत्यंत केंद्रीकृत स्वरूपात परीक्षा घेण्याची सध्याची प्रणाली अधिक जोखमीची ठरत आहे. आता विकेंद्रीकरणाचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय गुणवत्ता निकष कायम ठेवून राज्यनिहाय किंवा विभागनिहाय परीक्षा मॉडेल विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे असे डॉ इंगोले यांनी मत मांडले. पुढे डॉ इंगोले यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा मान्य आहे. कठोर परिश्रम मान्य आहेत. परंतु व्यवस्थेतील त्रुटींमुळे होणारा हा अन्याय मान्य असू शकत नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडली. देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे भविष्य आजच्या विद्यार्थ्यांच्या हातात आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणा जपणे ही शासन आणि परीक्षा यंत्रणांची सर्वोच्च जबाबदारी आहे. केंद्र शासन आणि एन टी ए यांनी पुनर्परीक्षेची तारीख तातडीने जाहीर करावी. आगामी परीक्षा पूर्ण पारदर्शकता, अभेद्य सुरक्षा आणि शून्य गैरप्रकार या तत्त्वांवर पार पाडली गेली पाहिजे. कारण प्रामाणिक विद्यार्थ्यांचा पराभव झाला, तर देशाच्या भविष्याचाच पराभव होईल असेही डॉ इंगोले यांनी यावेळी सांगितले.

### पाटोदा पोलीस स्टेशन

अशी मागणी जोर धरत आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची कानउघडणी करून, पेट्रोलच्या नावाखाली होणाऱ्या खर्चाचाही तपास करावा, अशी विनंती नागरिकांनी केली आहे.सामान्य जनतेने कोणाकडे जायचे?रात्रीच्या वेळी पोलिसांना फोन करूनही प्रतिसाद मिळत नसेल, तर गुन्हेगारांचे मनोबल वाढण्यास प्रशासनच खतपाणी घालत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आता वरिष्ठ अधिकारी यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### किरकोळ वादातून कुटुंबावर

नव्हे तर, आरोपीने तक्रारदाराच्या बहिणीचा विनयभंग करून कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिली.पोलीस कारवाई:या घटनेप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, हेड कॉन्स्टेबल हनुमान हरिभाऊ खेडकर (क्र१०८७) यांच्याकडे या प्रकरणाचा तपास सोपवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध मारहाण, विनयभंग आणि जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

### कुठलीही शिकवणी न लावता

परंतु यासाठी मोबाईल आवश्यक होता.आई सुवर्णाताई मोहन संघई यांनी आपला मोबाईल देत आयुषच्या अभ्यासाकडे लक्ष दिले.इयत्ता दहावीचा नुकताच निकाल लागला असुन यामध्ये आयुषने ९७.४० टक्के गुण घेत परळी तालुक्यातुन प्रथम येण्याचा मान मिळविला.वर्षभर अभ्यास करत असताना आयुषने आपले वडिल व काकांचा व्यवसाय असलेल्या हेमा गिफ्ट सेंटर या दुकानावर जाऊन व्यवसायात मदत करत अभ्यासाचे योग्य नियोजन मोबाईलचा सकारात्मक वापर करत मिळवलेले यश हे कौतुकास्पद ठरत असल्याने आयुष व कुटुंबियांचे कौतुक होत आहे.

दिवसातुन चार तास अभ्यास

शाळेव्यतिरिक्त आयुषने वर्षभर दररोज दोन तास ऑनलाईन शाळेतुन आल्यानंतर दोन तास अशा चार तास अभ्यासाचे नियोजन केले परिक्षा काळात पहाटे चार वाजता ऊठुन अभ्यास व रिव्हीझन दिल्याने हे यश मिळाले असुन यामध्ये काका महावीर,काकी मनिषाताई,आई सुवर्णताई,वडिल मोहनराव यांच्याबरोबरच शाळेतील शिक्षक गजानन नागझरे,राहुल गुट्टे,तोतला मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असुन भविष्यात पुणे येथे वाणिज्य शाखेत शिक्षण घेवुन सि.ए.बनण्याचा मनोदय आयुषने व्यक्त केला.

### राज्यातील ४८८ शाळांमध्ये

रुपयांची शिष्यवृत्ती

'मंथन' आणि 'आय एम विनर' परीक्षांद्वारे स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी

गुणवत्तेची दखल; राज्य शासनाचा मानाचा मुजरा

शिस्तबद्ध वातावरण, अनुभवी शिक्षक, सातत्यपूर्ण निकाल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या भक्कम परंपरेची दखल घेत राज्य शासनाने या शाळेला आदर्श शाळा म्हणून मान्यता दिली. या निवडीमुळे आधुनिक सुविधा, शैक्षणिक साधने आणि विकासकामांसाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

या ऐतिहासिक यशाबद्दल मराठवाडा भूषण लोकनेते आमदार माजी सभापती बद्रीनाथ जगताप, सरपंच बलभीम वाघमोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरविंद कुम्भकर, उपाध्यक्ष राजेंद्र पठाडे, सेवा सोसायटीचे अध्यक्ष अंगद जगताप, ग्रामपंचायत सदस्य, पालक, शिक्षणप्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ज्येष्ठांनी मुख्याध्यापक महेशकुमार शिंदे, सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

टाकळसिंगचा शिक्षणमंदिर पुन्हा ठरला राज्याचा आदर्श!

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंगने सिद्ध केले आहे की, गुणवत्तेचा ध्यास, शिक्षकांची तळमळ आणि ग्रामस्थांचा विश्वास असेल तर ग्रामीण भागातील शाळाही राज्यातील सर्वोच्च यादीत स्थान पटकावू शकते. पीएम श्री आदर्श शाळा योजनेतील ही निवड म्हणजे टाकळसिंगच्या शैक्षणिक परंपरेला मिळालेला सुवर्णमुकुट ठरला आहे.

### कवी नायगावकरांनी बीडकरांना

अखंडित लिहिली वाचली गेली तरच मराठी भाषा टिकेल असे नायगावकर म्हणाले. ग्रामीण भागातील लेखकांची, कवींची विलक्षण प्रतिभा रसिकांच्या समोर येत आहे हे कवी प्रभाकर साळेगावकर यांची कविता ऐकली की कळते असे ते म्हणाले.

साळेगावकरांच्या विडंबनात्मक कविता..

कवी प्रभाकर साळेगावकर यांनी काही विडंबनात्मक कविता,कवितेतील हायकू हा प्रकार, विश्वाकल्याणासाठीची प्रार्थना आणि साऱ्यांच्या मनात आई विषयी असलेल्या भावना व्यक्त करणारी आई ही कविता सादर करून रसिकांना साहित्याची बहुअंगी सफर घडवून आणली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महेश वाघमारे,सचिव दीपक कर्नावट ,उपाध्यक्ष मिलिंद सुंदर ,कोषाध्यक्ष विकास उमापूरकर, कार्यकारिणी संचालक संस्थापक अध्यक्ष अमर डागा,डॉ.अनुराग पांगरिकर,डॉ.प्रसन्न कुलकर्णी,ईश्वर मुथा,सीए .गोपाल मालू,प्रदीप मुळे,वाय जनार्धन राव,राम मोटवाणी,डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हांकर, विष्णूदास बियाणी, सुदर्शन धुतेकर, मानद संचालक डॉ. अनिल बारकुल,वासवदत्ता हसेगावकर् प्रज्ञा बडवे,प्रा. दीपक मुळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ,पंढरपूर वारी प्रसाद वाटप कार्यक्रम संपन्न

बीड । प्रतिनिधी

संत नामदेव नगर येथील रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ , संस्थापक



अध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी राजुरीकर आणि प्रा.डी.एस.कुलकर्णी यांची वैशाख मासातील पंढरपूर वारी संपन्न झाली.त्या निमित्त श्री प्रभाकर राव कुलकर्णी यांच्या निवास स्थानी प्रथम रुक्मिणी पांडुरंग प्रतिमेची विधियुक्त पूजा करून,सर्व वारकरी सदस्य मंडळी यांनी सामुदायिक हरिपाठ,गुरुपरंपरेचे अभंग ,विनंतीचे अभंग,मागणे ,त्यानंतर श्री अनंता मधुसुदना ही प्रार्थना आणि आरती आणि शेवटी पसायदान घेण्यात आले , सर्वांना अल्पोपहार वाटप करण्यात आला ,मंडळाचे अध्यक्ष श्री सुरेश जोशी पारगावकर यांनी या महिन्यातील वाढ दिवस असलेले श्री बाळासाहेब रत्नपारखी आणि श्री.मुकुंदराव खडके यांचा श्री हरीभाऊ बुगदे यांच्या शुभ हस्ते सत्कार केला तसेच अध्यक्ष श्री सुरेश जोशी यांनी यावर्षी अधिक मास निमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यासाठी लवकरच व्यापक बैठक घेउत, असा प्रस्ताव मांडला त्यास सर्वांनी टाळ्या वाजवून त्यास मान्यता दिली. श्री प्रभाकर कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी वारकरी मंडळ उपाध्यक्ष श्री देविदास डोळे, तसेच सदस्य सर्व श्री, प्रभाकर कुलकर्णी,,श्रीमुकुंदराव खडके,,हरिभाऊ बुगदे, कुमार राव देशमुख,,बाळासाहेब. रत्नपारखी, श्री राहुल सुर्डीकर,श्री, अशोकराव ओपळकर,,रामकृष्ण पंत जोशी,धनंजय लाखनगावकर,, दत्तात्रय रत्नपारखी, आर,डी, देशमुख,, तसेच सौ.शालिनी कुलकर्णी ,सौ, अंजली कुलकर्णी सौ.उषा कमलाकर कुलकर्णी हे उपस्थित होते✻असे प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा.डी.एस. कुलकर्णी यांनी कळविले आहे..

## मोठेवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील शार्दुलेश्वर शिक्षण संस्था संचलित महात्मा फुले विद्यालय मोठीवाडी येथील शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल लागल्यावर शाळेच्या वतीने मंगळवार रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दहावीच्या परिक्षेत कु. ऋतुजा बालासाहेब शेजुळ.८१.६० टक्के घेऊन प्रथम आली आहे.कु.सरिता जगन्नाथ खेत्री ८०.८० टक्के व कु. रोहिणी रघुनाथ पास्टे ८०.४० टक्के घेऊन द्वितीय आली आहेत.अमर मनसुके ,सक्षम सर्जे,सुमित जाधव,गणेश खेत्री हे तृतीय आले आहेत. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व पालकांचे संस्था अध्यक्ष माजी आमदार मोहनराव सोळंके,सचिव रामकृष्ण सोळंके यांनी अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापक आर.एम.मुंडे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पत्रकार राजाभाऊ पास्टे,जगन्नाथ खेत्री,गंगाधर रासवे,भगवान खेत्री,बालासाहेब जाधव,गणेश सर्जे यांची उपस्थिती होती.



## वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून विद्यार्थ्यांनी पुढे जावे - हेमंत धानोरकर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अंबाजोगाई शहरात मागील १७ वर्षांपासून अग्रेसर असलेल्या आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित आई सेंटर प्रो चे संचालक सर डॉ.नागेश जोंधळे हे शहरी व ग्रामीण भागातील तरूणांना योग्य दिशा, अचूक असे मार्गदर्शन व मोठी स्वप्ने पाहण्यासाठी अविरतपणे कार्यरत असून त्यांच्या या कार्याला विद्यार्थी तसेच पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग असून एक सजग, सुदृढ व इंग्रजी भाषेविषयी प्रचंड आवड व प्रभुत्व असलेली पिढी घडवण्याचे कार्य करत असल्याचे गौरवोद्गार योगेश्वरी नूतन विद्यालय येथील कृतिशील शिक्षक हेमंत धानोरकर यांनी आई सेंटर प्रो कॅम्पस गजानन कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई येथे आयोजित पालक सभा तथा यशवंतांचा गुणगौरव सोहळा या कार्यक्रमात केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आई सेंटर प्रो चे संचालक तथा विश्वविक्रमवीर सर डॉ.नागेश जोंधळे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून क्रियाशील शिक्षक हेमंत धानोरकर, विशेष अतिथी म्हणून अर्थतज्ज्ञ राजकुमार साळवी व पत्रकार प्रशांत लाटकर यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक हेमंत धानोरकर, उपस्थित मान्यवर आणि पालकांच्या हस्ते सर डॉ.नागेश जोंधळे लिखित द बेसिक स्पोकन इंग्लिश कोर्स पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीच्या मुखपृष्ठाचे अनावरण करण्यात आले. यावेळी दैनंदिन जीवनातील एक लाख वाक्य लिहून विश्वविक्रम करणारे ५ वी तील समर्थ सुषमा श्रीराम साखरे व ११ वी तील श्रेया पूनम अनिल ढोले यांचे मुखपृष्ठावर फोटो छापून त्यांना यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या सुरूवातीला केंद्र संचालक सर डॉ.नागेश जोंधळे यांनी प्रॅक्टिस, प्रॅक्टिस अँड मोअर प्रॅक्टिस, मेक्स अ मॅन परफेक्ट या टॅगलाईनवर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अंबाजोगाई शहरामध्ये मागील सतरा वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या बेसिक्स पासून ते डव्हान्स्ड स्किल्स डेव्हलपिंग प्रोग्राम यावरच आम्ही सातत्याने काम करीत आलो आहोत. तसेच विद्यार्थ्यांमध्ये अमुलाग्र बदल घडवत आलो आहोत. हेच आपल्या यशाचे रहस्य आहे असे आपल्या प्रास्ताविका मध्ये सर डॉ.जोंधळे यांनी सांगत उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या पाल्याच्या अभ्यासामध्ये पालकांची काय जबाबदारी आहे याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. तसेच पाल्याच्या जडणघडणीत पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी १ मे ते ३१ मे २०२६ पर्यंत खात्रीने व अस्खलितपणे इंग्रजी बोलण्यासाठी ३१ दिवसांचे चॅलेंज देऊन मुलांना प्रोत्साहित केले व विविध पारितोषिकांची घोषणा केली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हेमंत धानोरकर यांनी २१ व्या शतकामध्ये सर्वांना स्किल्सची आवश्यकता आहे. यासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या स्किल्स पैकी संवाद कौशल्ये, चिकित्सक विचार, डिजिटल साक्षरता आणि सहकार्य या चार स्किल्स संबंधी विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना समजेल अशा सहज व सोप्या भाषेमध्ये समजावून सांगितल्या. विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवावे आवश्यक तेवढा वेळ मुलांच्या हातात मोबाईल द्यावा ज्याचा उपयोग त्याच्या ज्ञानामध्ये होईल. पालकांनी मुलांच्या मोबाईल वापराविषयी सतर्क राहण्याचे तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून विद्यार्थ्यांनी पुढे जावे असे आवाहन त्यांनी केले. सदरील कार्यक्रम प्रसंगी २३ मार्च ते १२ एप्रिल २०२६ या २१ दिवस चॅलेंज स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये चॅम्पियन गटातून सान्वी गुट्टे, प्रिषा एकलवले, तसेच लीडरशिप बॅचमधील पल्लवी माने, मंजिला एकलवले, अंकिता भुरे, शारदा वड्डे यांनाही त्यांच्या परिवारासह सन्मानित करण्यात आले. तसेच १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत आयोजित नवीन चॅलेंजेस स्पर्धेमध्ये पहिल्या तीन दिवसांत छान कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये राजवीर प्रशांत लाटकर, आरोही व सिताराम अशोक सोलनकर, यश स्वाती नागेश जोंधळे व रिद्धी बालिका राहुल साळुंके यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. अशा रीतीने उत्साहपूर्ण वातावरणात पालक सभा संपन्न झाली. यावेळी आई सेंटरचे युवा समन्वयक पल्लवी माने यांनी उपस्थित मान्यवर, पालक व विद्यार्थ्यांचे ऋण व्यक्त केले. या पालक सभेसाठी विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### आई सेंटर प्रो: २१ डे चॅलेंज – अस्खलितपणे इंग्रजी बोलण्याचे आव्हान यशवंतांचा पालक सभेत गुणगौरव

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानासाठी १६७.७३ कोटींचा कृती आराखडा मंजूर

मुंबई : राज्यात कडधान्य उत्पादन वाढवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत सन २०२६-२७ साठी १६७ कोटी ७३ लाख २० हजार रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. यामध्ये केंद्र शासनाचा १०१ कोटी रुपयांचा तर राज्य शासनाचा ६६.६७ कोटी रुपयांचा हिस्सा आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी व पशुसंवर्धन विभागाने जारी केला आहे.केंद्र शासनाने २०२५-२६ च्या रब्बी हंगामापासून स्वतंत्र कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबवण्याचे धोरण निश्चित केले असून, पीक पद्धतीनुसार आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित लागवड पद्धती आणि पीक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन उत्पादनवाढ साधण्याचा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या कृती आराखड्यात मुलभूत बियाणे खरेदी, प्रमाणित बियाणे उत्पादन, प्रमाणीकरण शुल्क, प्रमाणित बियाणे वितरण, पीक



प्रात्यक्षिके, क्षेत्र विस्तारासाठी बियाणे किट वितरण, क्षमता बांधणी, काढणीपश्चात पायाभूत सुविधा, प्रशासकीय खर्च तसेच प्रकल्प व्यवस्थापनाचा समावेश करण्यात आला आहे.

योजनेंतर्गत प्रत्येक बियाणे उत्पादकाला कमाल पाच हेक्टर क्षेत्रापर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. तसेच प्रमाणित बियाणे वितरणासाठी प्रति शेतकरी कमाल एक हेक्टर क्षेत्रापर्यंत अर्थसाह्य मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्याकडे अ‍ॅग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे बंधनकारक करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२६-२७ हे वर्ष ''आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष'' म्हणून घोषित केल्यामुळे या अभियानात महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. पीक प्रात्यक्षिके शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांमार्फत राबवण्यात येणार आहेत. यासाठी शेतकरी गटाची नोंदणी ३१ मार्च २०२६ पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे. गट नोंदणीकृत असणे बंधनकारक असून महाडीबीटी पोर्टलवर प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर गटांची निवड केली जाणार आहे. प्रति गट कमाल २५ शेतकरी आणि प्रति गाव प्रति पीक जास्तीत जास्त दोन गटांना या अभियानाचा लाभ दिला जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

## मे महिन्यात कसे असेल हवामान, पावसाची शक्यता ?

पुणे : मागील काही दिवसांपासून राज्यात उष्णतेची लाट वाढली आहे. मे महिन्यात तापमानात अजून वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान सर्वाधिक असून कोकण किनारपट्टीलगत उष्णता वाढल्याचे सांगण्यात येत आहे. मे महिन्यात राज्यातील हवामान कसे असेल याबाबत हवामान विभागाने माहिती दिली असून पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.



देशाच्या बहुतेक भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे (दक्षिण द्वीपकल्पीय भारताचे अनेक भाग आणि पूर्व भारतातील काही भाग वगळता) जिथे कमाल तापमान सामान्य ते सामान्यपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, देशातील बहुतेक भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. मे २०२५ मध्ये, वायव्य आणि मध्य भारत आणि लगतच्या पूर्व भारतातील अनेक भागात उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगीय पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

मे २०२५ मध्ये संपूर्ण देशात सरासरी पाऊस सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे ( १०९%). देशाच्या अनेक भागात सामान्य ते सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य मध्य, पूर्व आणि ईशान्य भारतातील काही भाग वगळता सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. सामान्यत: मे महिन्यात उत्तरेकडील मैदानी प्रदेश, मध्य भारत आणि द्वीपकल्पीय भारतातील लगतच्या भागात सुमारे ३ दिवस उष्णतेची लाट असते. मे २०२५ दरम्यान, वायव्य आणि मध्य भारताच्या अनेक भागांमध्ये आणि लगतच्या पूर्व भारतातील सामान्यपेक्षा जास्त उष्णतेच्या लाटेचे दिवस असण्याची शक्यता आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, गंगेचा पश्चिम बंगाल आणि गुजरात, ओडिशा, छत्तीसगड, महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये आणि लगतच्या तेलंगणा आणि उत्तर कर्नाटकच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचे दिवस सामान्यपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

उष्णतेच्या लाटेदरम्यान, वाढलेले तापमानामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः वृद्ध, मुले आणि पूर्वीपासून आरोग्य समस्या असलेल्या लोकांसाठी, ज्यांना उष्णतेमुळे होणारे आजार जसे की उष्माघात आणि उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. याव्यतिरिक्त, दीर्घकाळापर्यंत अति उष्णतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते आणि पॉवर ग्रिड आणि वाहतूक व्यवस्था यासारख्या पायाभूत सुविधांवर ताण येऊ शकतो.

## जमिनीनुसार करा खरीप पिकांसाठी खतांची निवड

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते.मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोऱ्याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.खतांची निवड :खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.जमीन आणि पिकांनुसार करा खतांचा वापर :पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो. म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे. आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट. माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.




## क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरतांना घ्यावयाची काळजी

शेतीसाठी क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना प्रत्येक पाळीच्या वेळी पाण्यावाटे जमिनीत क्षार टाकले जातात. जमिनीस दिलेले पाणी बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. जमिनीचा निचरा बरोबर नसल्यास हे क्षार जमिनीच्या बाहेर किंवा जमिनित खोलवर जाऊ शकत नाही. अशा रीतीने जमिनीच्या वरच्या थरात क्षारांचे प्रमाण वाढत जाते आणि जमिनी क्षारयुक्त बनतात. क्षारयुक्त पाण्यात सोडियमचे प्रमाण जास्त असल्यास आणि पिकाखालील जमिनीत चुन्याचे प्रमाण कमी असल्यास जमिनी चोपण बनतात, म्हणजे त्या जमिनीतील सोडीयमचे प्रमाण वाढून तिचे प्राकृतिक गुणधर्म बिघडतात. त्यामुळे जमिनीचा सामू वाढून तिच्यातील अन्नद्रव्यांची उपलब्धतता कमी होते. आणि जमिनीची उत्पादनक्षमता खालावते. क्षारयुक्त आणि चोपण जमिनीची सुधारणा करतांना फार खर्च येतो आणि बराच कालावधी लागतो. त्यामुळे क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरतांना काळजी घ्यायला पाहिजे. आणि त्यासाठी पाण्याची प्रत माहिती करून घेणे आवश्यक आहे.

जमिनी क्षारयुक्त आणि चोपण बनतात :

क्षारयुक्त पाण्यात विद्राव्य क्षार जास्त प्रमाणात असतात. भारी पोताच्या आणि कमी निचऱ्याच्या जमिनीत अशा क्षारयुक्त पाण्याचा शेतीसाठी वापर केल्यास त्या जमिनी क्षारयुक्त किंवा चोपण बनतात. त्यांची उत्पादनक्षमता खालावते. कमी क्षारयुक्त पाणी हे सर्व प्रकारच्या जमिनीसाठी आणि पिकांसाठी वापरता येते.तरी पण जमिनीचा निचरा फार कमी असल्यास निचरा चर खोदणे आवश्यक ठरते.मध्यम क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरता येते, परंतु त्यासाठी जमिनीचा निचरा चांगला असायला पाहिजे.तो कमी असल्यास निचरा चराची तजवीज करावी लागते.त्याचप्रमाणे क्षारास मध्यम संवेदशील असलेल्या पिकांची निवड करणे आवश्यक ठरते.



जमिनीचे गुणधर्म लक्षात घेणे आवश्यक :

चांगल्या प्रतीचे पाणी शेतीसाठी वापरताना सुध्दा काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. असे पाणी वापरताना ते ज्या जमिनीस द्यावयाचे आहे त्या जमिनीचे गुणधर्म लक्षात घेणे आवश्यक असते. जमिनीचा पोत भारी, निचरा कमी आणि जमिनीत खालच्या थरात क्षारांचे प्रमाण जास्त असल्यास पाण्याची प्रत चांगली असूनही त्याचा वापर करणे योग्य नसते आणि अशा जमिनीस पाण्याचा वापर करायचा असल्यास जमिनीचा निचरा सुधारण्यासाठी निचरा चर, सेंद्रीय खतांचा जास्त प्रमाणात वापर, कमी कालावधीचे आणि कमी पाणी लागत असलेल्या पिकांची निवड आणि पाणी देण्याची योग्य पद्धत ह्या बाबींचा अवलंब करणे आवश्यक असते. पाणी तपासणीसाठी नमुना कसा घ्याल ?

पाणी तपासणीसाठी एक लिटर पाणी पुरेसे होते. पाण्याचा नमुना स्वच्छ प्लास्टिकच्या बाटलीत घ्यावा. विहिरीतून पाण्याचा नमुना घेताना विहिरीच्या मध्य भागातील काही बादल्या पाणी उपसून टाकल्यानंतर पाण्याचा नमुना घ्यावा. तसेच बोअरवेल मधील पाण्याचा नमुना घेताना १ ते २ तास पंप सुरु केल्यानंतर घ्यावा. नदी, ओढे व कॅनॉल याच्यामधील पाण्याचा नमुना वाहत्या पाण्यामधून मध्यभागी घ्यावा. पाण्याचा नमुना बाटलीत भरण्यापूर्वी बाटली त्या पाण्याने दोन ते तीन वेळा विसळून घ्यावी व बाटलीवर घट्ट बुच बसवून नमुना तपासणीसाठी ताबडतोब जवळच्या प्रयोगशाळेकडे पाठवावा.

कारण अशा नमुन्याचे चोवीस तासात तपासणी करणे आवश्यक आहे.बाटलीसोबत शेतकऱ्याचे नाव, पत्ता आणि नमुना कशातून घेतला याबाबतची सविस्तर माहिती लिहिलेली असावी.क्षारास प्रतिकार करणारी पिके : कापूस, ताग, धौचा, शुगरबीट, ओट, पालक, घास, खजूर, बार्ली, नारळ, पेरू, निलगिरी, चिकू

मध्यम प्रतिकार करणारी पिके : गहू, ज्वारी, बाजरी, मका, ऊस, सूर्यफुल, सोयाबीन, भुईमुग, अंजीर, बोर, डाळिंब, पपई, द्राक्ष, कलिंगड, आंबा, केळी, टोमॅटो, गाजर, काकडी, भोपळा, कांदा, बटाटा, लसूण.

क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना घ्यावयाची काळजी : जमिनीला साधारणतः उतारा द्या. उताराच्या दिशेने खोल नांगरट करा.

शेतात उताराच्या दिशेने योग्य मशागत करा. पिकाची लागवड सरीच्या बगलेत करा. पिकांमध्ये नियमित वेळोवेळी उताराच्या दिशेने आंतरमशागत करा. सेंद्रीय खतांचा तसेच हिरवळीच्या खतांचा जास्त प्रमाणात वापर करा. रासायनिक खतांमध्ये नत्रयुक्त खतांचा शिफारशीपेक्षा २५ टक्के जास्त वापर करा. सरीमध्ये पाचटांसारखे आच्छादन टाका. पिकांना वारंवार परंतु मर्यादित पाणी द्या. पाण्याचे पाणी उपलब्ध असल्यास खारवट पाण्यात ते ठराविक प्रमाणत मिसळू द्या. एक आड एक सरी भिजवा. ठिबक सिंचन वापर, विद्राव्य क्षारांची मात्रा २ डेसीसायमन प्रति मीटरपेक्षा कमी असल्यास करावा. क्षार सहनशील पिकांची निवड करावी. उदा. गहू, ज्वारी, ऊस, मका. सूर्यफुल, कापूस, शुगरबीट, ई.

पाणी जास्त क्षारयुक्त असेल तर निलगिरी, बांबू, सुबाभूळ इत्यादिंची वृक्षशेती करावी.

पाणी तपासणीसाठी नमुना कोठे पाठवाल ? महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातर्फे,प्रत्येक जिल्ह्यात मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत,तसेच राज्यातील चारही कृषि विद्यापीठाच्या कार्य क्षेत्रातील काही संशोधन केंद्रांवर तसेच राज्यातील काही कृषि विज्ञान केंद्रे;साखर कारखाने; खाजगी खत कंपन्या येथे मातीपाणी परिक्षणाची सुविधा शुल्कासह केली जाते.




### महत्वाच्या घटना

१७१८ : जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
१७३० : रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
१८११ : पॅराग्वेला (स्पेनकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१८३६ : सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणार्या 'बेलीज बीड्?स'चे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
१९०५ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वेगास शहराची स्थापना करण्यात आली.
१९२८ : मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शो मधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
१९३५ : मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९४० : सॅन बर्नाडिनो, कॅलिफोर्निया येथे 'मॅक्डोनाल्डस'चे पहिले उपहारगृह सुरू झाले.
१९४० : दुसरे महायुद्ध हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५८ : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ३ चे प्रक्षेपण केले.
१९६० : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ४ चे प्रक्षेपण केले.
१९६१ : पुण्याच्या चतु:शृंगी वीजकेंद्रात प्रचंड स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू
१९८० : संपूर्ण भारतीय बनावटीच्या गोदावरी या पाणबुडीचे माझगाव गोदीमध्ये जलावतरण.
१९९३ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिवार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
२००० : दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील मंडीपुरा येथे अतिरेक्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जम्मू काश्मीरचे ऊर्जा राज्यमंत्री गुलाम हसन बट यांच्यासह ५ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारक.
१८५९ : पिएर क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ.
१८९२ : भारतीय वकील व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभा मतदार संघाचे सदस्य आणि मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल हरि विनायक पाटसकर यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. श्री. जोग साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७७)
१९०७ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१४ : तेनसिंग नोर्गे, एव्हरेस्ट वर प्रथम चढाई करणार्या एडमंड हिलरी यांचे सहकारी.
१९२६ : माजी भारतीय नौदल अधिकारी महेंद्रनाथ मुल्ला यांचा जन्मदिन.
१९६७ : माधुरी दिक्षीत-नेने अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत जनाबाई.
१७२९ : वैशाख व. १४, शके १६५१ मराठेशाहीच्या आपत्?प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन.
१९५८ : मुगल राजघराण्यातील प्रमुख भारतीय इतिहासकार यदुनाथ सरकार यांचे निधन.
१९९३ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (जन्म: २८ जानेवारी १८९९)
१९९४ : पी. सरदार, चित्रकार व दिनदर्शिका चित्र निर्माता.
१९९४ : ओम अग्रवाल जागतिक हौशी स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेतील एकमेव भारतीय विजेता
२००० : सज्जन जुन्या जमान्यातील चित्रपट व नाट्य अभिनेते. तलाक (१९५८), बीस साल बाद (१९६२)
२००३ : अमेरिकेतील प्रसिद्ध गायिका जून कार्टर यांचे निधन
२००७ : लिबर्टी विद्यापीठाचे स्थापक जेरी फेलवेल यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९३३)
२०१० : भारताचे ११ वे उपराष्ट्रपती व राजस्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत यांचे निधन.

## जाणून घ्या वासरांमधील उष्माघात

उष्माघात ही वासरांसाठी जीवघेणी स्थिती आहे. उष्माघातामुळे वासरांच्या शरीराचे तापमान त्याच्या सामान्य तापमानापेक्षा जास्त होते, त्यामुळे संपूर्ण शरीरातील कार्यप्रणाली नष्ट होऊ शकते. ताप हा जंतुसंसर्ग झाल्यामुळे येतो, तर उष्माघात जास्त तापमान, हवेतील आर्द्रता आणि हवा खेळती नसणे अशा कारणांमुळे होतो.

कारणे : वातावरणातील जास्त उष्णता. वासरांच्या शरीरातील तापमान नियंत्रित करणाऱ्या प्रक्रियेचा अभाव. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण. गोठ्यामध्ये हवा खेळती नसणे. शरीरात पाण्याची पातळी घटल्यास घाम येणे, श्वासाद्वारे शरीराचे तापमान नियंत्रित करणे कठीण होते. वातावरणातील तापमान अचानक वाढल्यास, वासराच्या शरीराचे तापमान नियमित ठेवण्याची क्षमता कमी होते.लक्षणे : अशक्तपणा जाणवतो.वासरे बसून असतात. वासरांची हालचाल मंदावते. शरीरातील ऊर्जेचा अभाव.वासरांची वाढ खुंटते. वासरांच्या हालचालींचा अभाव.श्वसन दर वाढतो. गंभीर परिस्थितीमध्ये वासरांचे तोंड उघडे राहते, तोंडातून जास्त लाळ गळते. घाम येतो, त्वचा कोरडी पडते. उष्णतेच्या तणावामुळे हृदयाचे ठोके वाढतात.स्नायूंचे आकुंचन होते.

निदान : वासरांच्या शरीराचे तापमान मोजावे. त्वचेची घडी चाचणीद्वारे वासरांच्या शरीरातील पाण्याची पातळी (निर्जलीकरण) तपासली जाते. रक्त चाचणी.

उपचार, प्रतिबंधात्मक उपाय : गोठ्यात हवा खेळती असावी. वासरांना जास्त गर्दीत ठेवू नये. वासरांना नियमित चोवीस तास मुबलक प्रमाणात थंड आणि शुध्द पाणी द्यावे. सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा चारा द्यावा, जेणेकरून पचनाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी उष्णता कमी होते. आहारामध्ये जास्त प्रमाणात तंतूमययुक्त चाऱ्याचा समावेश टाळावा, कारण यामुळे उष्णता वाढते. पाण्यामध्ये इलेक्ट्रोलाइट्सचा समावेश करावा, जेणेकरून वासरांच्या शरीरातील पाण्याचे संतुलन टिकून राहील.

# श्रेयवादाच्या रुळावरून तुळजापूर रेल्वे सुसाट

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिव जिल्ह्यावर असलेला 'दुष्काळी' शिक्का पुसण्यासाठी सर्व पक्षांची लढाई मागील सत्तर वर्षांपासून सुरू असली तरी हा शिक्का पुसण्यापेक्षा तो अधिक ठळक होत गेला. यात दोष राजकीय पक्षांचा की सत्तेची ऊब अनुभवणाऱ्या राजकीय नेत्यांचा? हा स्वतंत्र चर्चेचा मुद्दा आहे. आजघडीला सर्वात मोठा विषय चर्चेत आहे तो म्हणजे धाराशिव ते तुळजापूर रेल्वेचे काम. हे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

गेल्या आठवड्यातच भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शिंगोली गावातील होणाऱ्या रेल्वे पुलाची माहिती दिली. त्यानंतर सोशल मीडियावर भाजप तसेच ठाकरे यांच्या शिवसेनेकडून जोरदार टोलेबाजी सुरू झाली. खासदार यूबीटी शिवसेनेचे असून आमदार भाजपचे आहेत. त्यामुळे हे काम नेमके कोणाचे यावरून सोशल मीडिया वॉर रंगले आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तुळजापूर येथे जाहीर सभेसाठी आले होते. त्या वेळी त्यांनी तुळजापूर शहर रेल्वेच्या नकाशावर आणण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. त्या वेळी तुळजापुरातून भाजपचा पराभव झाला. अर्थात शिवसेना व भाजप हे दोन्ही पक्ष त्या वेळी स्वतंत्र निवडणूक लढवत होते. पुढे २०१९ च्या निवडणुकीत मात्र भाजपने ही जागा जिंकली.

तत्पूर्वी सहा महिने अगोदर झालेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेतर्फे ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी राष्ट्रवादीचे तत्कालीन नेते राणाजगजितसिंह पाटील यांचा पराभव केला होता. तर तेच पाटील पुढे भाजपतर्फे तुळजापुरातून विधानसभेवर पोहोचले. त्या वेळी खा. राजेनिंबाळकर यांनी प्रत्येक महिन्याला तुळजापूर ते सोलापूर रेल्वेमार्गाच्या प्रगतीचा आढावा घेण्याचा सिलसिला सुरू ठेवला. त्या वेळी प्रत्येक वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात अतिशय तोकडी तरतूद या मार्गासाठी व्हायची. तरीही खा. राजेनिंबाळकर यांनी सातत्याने रेल्वेच्या आढावा बैठका कायम ठेवल्या. त्या वेळी राज्यातही महायुतीची सत्ता होती. त्यामुळे राजकीय गणितेही बदलली होती.

२०२२ मध्ये राज्यात पुन्हा सत्ता बदल झाल्यानंतर मात्र राजकीय ईर्ष्या टोकाला पोहोचली. त्यातूनच तुळजापूर रेल्वेमार्गाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. हा विषय हळूहळू पुढे सरकू लागला. या काळातही लोकसभेत खा. राजेनिंबाळकर यांनी रेल्वेचे प्रश्न मांडत पाठपुरावा सुरूच ठेवला. तर इकडे राज्य सरकारच्या वाट्याचा हिस्सा भरण्याच्या निमित्ताने आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी या रेल्वेमार्गाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

२०२२ ते २०२५ या तीन वर्षांच्या काळात बऱ्यापैकी तरतूद झाल्याने पहिल्या टप्प्यात धाराशिव ते तुळजापूरपर्यंतचे काम हाती घेण्यात आले. आता या कामाला बऱ्यापैकी गती मिळाली आहे. मोठ्या पुलांची कामे रेल्वेने हाती घेतली असून रुळ अंथरण्याची तयारीही सुरू केली आहे.

या प्रकल्पातील अत्यंत कठीण आणि महत्त्वाचा टप्पा असलेल्या शिंगोलीजवळील सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे पुलाचे काम आता प्रगतीपथावर आहे. विशेष म्हणजे, मध्य रेल्वेच्या इतिहासातील हा सर्वाधिक लांबीचा १०६ मीटर लांबीचा 'सिंगल स्पॅन' पूल असेल. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या ८४.४४ किमी लांबीच्या नवीन रेल्वे लाईनच्या कामाच्या प्रगतीचा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शिंगोली येथे प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन आढावा घेतला. त्यांनी ही माहिती जाहीर केल्यानंतर लागलीच शिवसेनेतर्फे सोशल मीडियावर खा. राजेनिंबाळकर यांनी केलेल्या पाठपुराव्याची यादी टाकत आ. पाटील यांनी फुकटचे श्रेय घेऊ नये, असा टोला लगावला. तर तत्काळ भाजपनेही या टीकेला जोरदार प्रत्युत्तर देत ठाकरे सरकारच्या काळात हा प्रकल्प कसा रखडला होता व भाजप सत्तेवर आल्यानंतर प्रकल्पाला कशी गती मिळाली, याची माहिती शेअर करण्यात आली. त्यानंतर दोन्ही बाजूंनी अद्यापही श्रेयवाद रंगलेलाच आहे. एका बाजूला हा वाद असला तरी दुसऱ्या बाजूला मात्र या प्रकल्पाचा धाराशिव ते तुळजापूर हा पहिला टप्पा मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. तर, सोलापूर ते तुळजापूर हा दुसरा टप्पा त्यानंतर पूर्ण केला जाणार आहे.

## नांदेड ग्रामीण पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा; चौघांना अटक

**नांदेड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पुकारलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन मोहिमेंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. एमआयडीसी परिसरातील एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून पोलिसांनी १ लाख ३ हजार ५० रुपयांच्या मुद्देमालासह चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.**



पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. याच मोहिमेंतर्गत रविवारी (दि. १०) नांदेड ग्रामीण पोलिसांना एमआयडीसी परिसरात आदित्य वजन काट्याजवळ काही जण जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्याआधारे पोलीस पथकाने दुपारी ३ वाजेच्या सुमारास सापळा रचून धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, दोन मोबाईल फोन आणि एक मोटारसायकल असा एकूण १,०३,०५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी विलास प्रल्हादराव गजभारे (वय ४५, रा. गोपाळचावडी),नारायण बळीराम चिटलेवार (वय ५०, रा. बळीरामपुर), प्रसाद संजय सूर्यवंशी (वय २३, रा. येळी, ता. लोहा),संदिप धोंडीबा जगदंबे (वय ३९, रा. सिडको, नांदेड) या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, वसंत केंद्रे, मारोती पंचलिंग, शंकर माळगे, समीर अहेमद आणि धम्मपाल कांबळे यांच्या पथकाने सहभाग घेतला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सोशल मीडियावर शस्त्रासह फोटो टाकणे पडले महागात

नांदेड : शहरात गुन्हेगारी वृत्तीला लगाम घालण्यासाठी नांदेड ग्रामीण पोलिसांनी ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत धडक कारवाई सत्र सुरू केले आहे. रविवारी (दि. १०) पोलिसांनी विविध ठिकाणी सापळा रचून बेकायदेशीररीत्या शस्त्र बाळगणाऱ्या तीन इसमांना अटक केली. त्यांच्याकडून दोन धारदार लोखंडी खंजर जप्त करण्यात आले असून, याप्रकरणी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही तरुण विनापरवाना शस्त्रे घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने सूर्या गार्डन कमान आणि चंदासिंग कॉर्नर परिसरात सापळा लावला. या कारवाईत पोलिसांनी अमोल संजय वाघमारे (वय २१, रा. वडारगल्ली, इतवारा) आणि जसिंदरसिंग रामसिंग दुधानीया (वय ३७, रा. चंदासिंग कॉर्नर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे झडती घेतली असता, कमरेला लपवून ठेवलेले धारदार खंजर मिळून आले. तिसरा आरोपी शेख आयान ऊर्फ आयान मार्क (रा. देगलूर नाका) याने स्वतःकडील शस्त्राचा फोटो काढून या इंस्टाग्राम अकाउंटवर अपलोड केला होता. सोशल मीडियावरील या स्टंटबाजीची दखल घेत पोलिसांनी त्यालाही बेड्या ठोकल्या.

## नांदेड परिक्षेत्रात ९ दिवसांत ६६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड पोलिस परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलिस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सुरू केलेली धडक मोहीम सुरु केली आहे. मोहिमेच्या नवव्या दिवशी परिक्षेत्रात तब्बल ७४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १०० जणांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली आहे. या एकाच दिवसाच्या कारवाईत ६६ लाख १५ हजार ८५३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे.

राज्य शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. नवव्या दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून ५२ हजार ४१८ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला.या प्रकरणातील आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कलमांतर्गत आरोपींना १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असल्याने अवैध विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ९१ ५० १०० १०० या खबर हेल्पलाईन क्रमांकाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या हेल्पलाईनमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून, नागरिकांनी व्हॉट्सप किंवा फोनद्वारे माहिती देण्याचे आवाहन शहाजी उमाप यांनी केले आहे.परिक्षेत्रात मटका आणि जुगार खेळणाऱ्या ४१ जणांविरुद्ध २९ गुन्हे नोंदवून ६.१५ लाखांचा माल जप्त केला. तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्या ३७ जणांवर ३३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ८ लाखांची दारू जप्त केली. वाळू माफियांविरुद्धही दोन मोठे गुन्हे दाखल करून २३.२९ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

## तलाठी भरतीचे आमिष : दोघांना ६५ लाखाला गंडा

संभाजीनगर । प्रतिनिधी

तलाठी भरतीत नोकरीच्या आमिष दाखवत दोघांना ६५ लाख रुपयांचा गंडा घालणारा भामटा मध्यप्रदेशातील जबलपूरमध्ये लपून बसला होता. ही माहिती मिळताच सिडको पोलिसांनी थेट जबलपूरमध्ये शोध मोहीम राबवून त्याला अखेर बेड्या ठोकल्या. सोमवारी न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. विशाल रामसिंग परदेशी (रा. पवननगर, एन ९), असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

निवृत्त कर्मचारी शंकर पंडित दुसाने हे फिर्यादी आहेत. १६ मे २०२५ रोजी त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात परदेशीच्या एका साथीदाराला अटकपूर्व जामीन मिळाला होता. मात्र, तेव्हापासून विशालचा पोलिसांना थांगपत्ता लागत नव्हता. नुकते विशाल हा जबलपूरमध्ये लपून बसल्याचे सहायक पोलिस निरीक्षक योगेश गायकवाड यांच्या तांत्रिक तपासादरम्यान समोर आले. गायकवाड यांनी पथकासह जबलपूर गाठले आणि विशालला ताब्यात घेतले.

दुसाने यांना दोन मुले, एक विवाहित मुलगी आहे. त्यांच्या जावयाने विशाल हा तलाठी भरतीत नोकरी लावून देण्याचे काम करीत असल्याचे त्यांना सांगितले होते. त्यावरून विशालसोबत बैठक झाली. दोन्ही मुलांसाठी प्रत्येकी २५ लाख, असे एकूण ५० लाख रुपये देण्याचे ठरले. ही रक्कम मंगलमूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेत फिक्स डिपॉझिट (एफडी) म्हणून ठेवण्यात आली. मात्र, निवड यादीत दुसानेंच्या दोन्ही मुलांची नावे नव्हती. दुसाने यांनी बँकेतील पैशांची माहिती घेतली असता आरोपी विशालने पतसंस्थेचा अध्यक्ष रत्नाकर जोशी याच्या मदतीने ती रक्कम आधीच लाटली होती. असाच प्रकार श्रीकांत पाखरे यांच्यासोबतही घडला होता. त्यांचे १५ लाख रुपये त्याने लंपास केले होते.

## तोतया पोलिसांनी खऱ्या पोलिसांना आणले जेरीस

संभाजीनगर । प्रतिनिधी

शहरात तोतया पोलिसांनी धुमाकूळ घालून खऱ्या पोलिसांना जेरीस आणले आहे. पोलिस असल्याची थाप मारून अनेकांना गंडवण्याच्या घटना घडत असताना तोतया पोलिस मात्र खऱ्या पोलिसांना जेरीस आणत आहेत. नुकताच अशीच घटना सिडको एन-३ भागात घडली. एका ६७ वर्षीय वृद्धेचे तब्बल ९ तोळ्यांचे दागिने हातोहात लंपास केले. ही घटना जैन मंदिरासमोर घडली. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



स्वामी विवेकानंदनगर येथील रहिवासी श्रीकंवरबाई इंदरचंदजी लुंकड या नेहमीप्रमाणे सोमवार (दि.११ मे) सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास जैन मंदिरातून दर्शन घेऊन पायी घरी परतत होत्या. छत्रपती कॉलेजसमोरील एका ड्रायक्लिनर जवळ येताच, दुचाकीवरून आलेल्या दोन भामट्यांनी त्यांना रोखले.

पोलिस असल्याचे भासवून ओळ खपत्रही दाखवले. या भागात चोऱ्या वाढल्या आहेत, तुमचे दागिने काढून पिशवीत ठेवा अशी थाप मारली. तेल लावून काढले दागिने वृद्धेने हातातील सोन्याच्या पाटल्या काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या निघत नव्हत्या. अशातच या भामट्यांनी वृद्धेच्या हाताला खोबरेल तेल लावून सहा तोळ्यांच्या पाटल्या, गळ्यातील २ कंठी चेन आणि सोन्याच्या अंगठ्या असा ९ तोळ्यांचा ऐवज काढून घेतला. दागिने पिशवीत ठेवताना एका भामट्याने ते कागदात गुंडाळण्याचा बहाणा केला.वृद्धेला शंका आल्याने तिने दागिने दाखवा असे म्हणताच त्या भामट्यांनी तुमचे तुम्ही बघत बसा असे उद्धट उत्तर देऊन दोन्ही भामटे दुचाकीवरून पसार झाले. ते जाताच वृद्धेने पुडी उघडून पाहिली असता, समोर तांबे पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

## स्व. सुरेशकुमार जेथलिया यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

### सर्वसामान्यांचे दुःख जाणून घेणारा नेता हरपला

मंठा। प्रतिनिधी

मंठा येथे परतूर मंठा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार स्व. सुरेशकुमार जेथलिया यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. माय - माऊलींचा आदर करणारे, वयोवृद्धांना सन्मान देणारे, संयमी आणि अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात मंगळवार तारीख १२ रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाजार समितीचे सभापती ए. जे. बोराडे, उपसभापती गोपाळराव बोराडे, संचालक ॲड. पंकज बोराडे, प्रल्हादराव बोराडे, अण्णासाहेब खंदारे, किसनराव मोरे, संतोष वरकड, दत्तप्रसाद बनसोडे, हरिभाऊ चव्हाण, उदयसिंह बोराडे, बबनराव गणगे, तुळशीराम अहिरे, केशव महाराज सरकटे, अचित बोराडे, योगेश अवचार, दिलीप चव्हाण यांची उपस्थिती होती.



सभापती ए. जे. बोराडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, स्व. जेथलियाजी आणि माझे कौटुंबिक नाते होते, सलग तीस वर्षाची आमची मैत्री असताना मागील निवडणुकीत एकमेका विरोधात लढलो तरीही आमच्या मैत्रीत फरक पडला नाही. असे सांगून राजकारणातून समाजकारण करण्याचा पायंडा त्यांनी पाडल्याचे सांगितले.

यावेळी उपसभापती गोपाळराव बोराडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्व. जेथलियांचे अतिशय निकटचे सहकारी बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब खंदारे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली व जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी ॲड. पंकज बोराडे यांनी स्व. जेथलिया अत्यंत संयमी व्यक्तिमत्व असल्याचे सांगितले. यावेळी किसनराव मोरे, दत्तप्रसाद बनसोडे, हरिभाऊ चव्हाण, विनायक बाहेकर, डॉ. बी जे काळे यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. यावेळी बंडू मोरे, कयूमभाई कुरेशी, शबाब कुरेशी, मुसाभाई कुरेशी, कबीर तांबोळी, दादाराव हिवाळे, दिलीप हिवाळे, चंदू बोराडे यांच्यासह बाजार समितीचे सर्व संचालक, सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जामखेड शहरातील विविध विकासकामांची आ. रोहित पवारांकडून पाहणी

### बसस्थानक, जिल्हा उपरुग्णालय, व्यापारी संकुल, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा घेतला आढावा

जामखेड

कर्जत-जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी आज जामखेडमध्ये सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे नवे कार्यालय, अत्याधुनिक एसटी स्थानक, व्यापारी संकुल, महसूल कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, जिल्हा उपरुग्णालय, जलशुद्धीकरण केंद्र तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा आढावा घेत त्यांनी विकासकामे दर्जेदार, गतिमान आणि लोकाभिमुख पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणीही त्यांनी जाणून घेतल्या.

जामखेडमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र व प्रशस्त कार्यालय नसल्याने अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर उभारण्यात येत असलेल्या नव्या विभागीय कार्यालयाच्या कामाची आ. रोहित पवार यांनी पाहणी केली.



कामाची गुणवत्ता कायम राखत ते वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर जामखेडमधील नव्या सुसज्ज एसटी स्थानक व शॉपिंग सेंटरच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांसाठी एसटी ही आजही सर्वात महत्त्वाची आणि परवडणारी वाहतूक सेवा असल्याचे सांगत प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी प्रशासन आणि ठेकेदारांना सूचना केल्या. यावेळी त्यांनी प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षाही जाणून घेतल्या. युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सुमारे ११.५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या १५० गाळ्यांच्या व्यापारी संकुलाच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. हे काम दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण व्हावे, यासाठी अधिकाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या. तसेच महसूल कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या निवासस्थानांच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. कर्मचाऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्यास नागरिकांनाही अधिक परिणामकारक सेवा देता येते, या भूमिकेतून ही निवासस्थाने उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. निवासस्थाने पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांची राहण्याची अडचण दूर होऊन त्यांना रोज दूरवरून प्रवास करण्याची गरज भासणार नसल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी जिल्हा उपरुग्णालयाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत त्यांनी आरोग्य सुविधांबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. रुग्णांना दर्जेदार आणि तत्पर आरोग्यसेवा मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच जामखेड शहराला शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने लेहणेवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करून तेथील अडचणींचाही त्यांनी आढावा घेतला. राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंदर्भात बोलताना आ. रोहित पवार यांनी विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले. विकासकामांमध्ये राजकारण न करता जनहिताला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मुक्या जनावराला पाण्यासून वंचित ठेवणाऱ्या पाटबंधारे विभागाला आणले वटणीवर

जालना। प्रतिनिधी

मुक्या जनावराला पाण्यासाठी वंचित ठेवणारे पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांना वाटणेवर आणले व तसेच कालव्याचे गेट उघडून पाणी सोडले यामुळे शेतकऱ्यांनी श्री घाटगे यांचे आभार मानले.घनसावंगी तालुक्यातील मुरमा, कंडारी, खालापुरी, पिंपरखेड, कोठी, अंतरवाली टेंभी, मुद्रेगाव आणि पाडुळी या गावांमध्ये सध्या पाण्यासाठी तीव्र हाहाकार माजला असताना भीषण पाणीटंचाईच्या स्थितीत प्रशासनाकडून जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून नदीपात्रात पाणी सोडण्यास टाळाटाळ करण्यात आली. स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी वारंवार उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि पाटबंधारे विभागाकडे दाद मागितली. रविवारी मध्यरात्री भाजपा नेते सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांसह तीर्थपुरी येथील 'एस्केप गेट'वर धडक देऊन तीर्थपुरी एस्केप गेटचे दरवाजे उघडले आणि जायकवाडीच्या डाव्या कालव्यातील पाणी नारोळा नदीपात्रात वळवून घेतले.

प्रशासकीय स्तरावर वारंवार विनंत्या आणि अर्ज देऊनही, विशेषतः मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी कोणतीही हालचाल न झाल्याने शेवटी शेतकऱ्यांचा संयम सुटला. रविवारी शेकडो शेतकऱ्यांनी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सतीश घाटगे यांनी आक्रमक भूमिका घेतली. रविवारी मध्यरात्री सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांसह तीर्थपुरी येथील 'एस्केप गेट'वर धडक दिली. यावेळी त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन एस्केप गेटचे दरवाजे उघडले आणि जायकवाडीच्या डाव्या कालव्यातील पाणी नारोळा नदीपात्रात वळवून घेतले. सोमवारी सकाळी नदीपात्रात पाणी दाखल होताच शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून संबंधित गावांचा पाण्याचा प्रश्न तात्पुरता सुटला आहे.

# अवैध मुरूम उत्खनन : निमगांव (मा)ग्रामपंचायतीला ३१ लाखाचा दंड

## शासन परवानगीशिवाय उत्खनन आले अंगलट; सरपंच व ग्रामसेवकांना मोठा दणका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील निमगांव (मायंबा) येथील ग्रामपंचायतीने शासनाची परवानगी न घेता अवैध गौण खनिज मुरूम उत्खननाच्या प्रकणावर प्रशासनाने आता कठोर भूमिका घेतली असून,बीड उपविभागीय अधिकारी कार्यालयाने निमगांव (मा) ता.शिरूर (का) जि.बीड येथील ग्रामपंचायतीवर तब्बल ३१ लाख ८९ हजार १९१ रुपयांचा दंड ठोठावत मोठी कारवाई केली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास कारवाई केली जाईल.या कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, निमगाव मायंबा ग्रामपंचायती मार्फत शासनाची आवश्यक परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन करण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने सखोल चौकशी केली. महसूल विभाग, गौण खनिज विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालानंतर अवैध उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाल्याने उपविभागीय अधिकारी बीड कार्यालयाने निमगाव मायंबा ग्रामपंचायतला ३१ लाख ८९ हजार १९१ रुपयाचा दंड ठोठावला आणि दंड न भरल्यास ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई होणार अशी कठोर



कारवाई केली.

चौकशीत उत्खननासाठी आवश्यक असलेली शासकीय मान्यता, पर्यावरणीय परवानगी तसेच गौण खनिज वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसल्याचे निदर्शनास आले. शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### अशोक कातखडे यांच्या पाठपुराव्याला यश



भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक कातखडे यांनी या प्रकरणी प्रशासनाकडे पाठपुरावा केला असल्याने त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून आता कारवाई अटळ असल्याचे आकाश वाघमारे यांनी म्हटले आहे.

प्रशासनाने संबंधितांकडून रॉयल्टी, दंडात्मक रक्कम आणि इतर शुल्क वसूल करण्याचे आदेश दिले असून, नियमानुसार पुढील कारवाई करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अवैध उत्खनन करणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला असून, महसूल विभागाच्या कारवाईची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

दरम्यान, जिल्ह्यात वाढत चाललेल्या अवैध गौण खनिज उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून, शासनालाही मोठ्या महसुलापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या कारवाईमुळे निमगाव मायंबा ग्रामपंचायत जिल्हा मोठा दणका बसला असून जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

# पाटोदा पोलीस स्टेशन की शोभेची वस्तू?

## रात्रीच्या वेळी मदतीसाठी केलेला फोनही उचलला जाईना!

पाटोदा । प्रतिनिधी

शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढत असताना सामान्य नागरिक असुरक्षिततेच्या सावटाखाली वावरत आहेत. मात्र, अशा संकटकाळी संरक्षणाची जबाबदारी असलेले पाटोदा पोलीस स्टेशन सध्या केवळ 'शोभेची वस्तू' बनले आहे की काय, असा सवाल उपस्थित होत आहे.नेमका प्रकार काय?काल रात्री पाटोदा शहरात एका दक्ष नागरिकाने सतीश गरजे पत्रकार यांनी सुरक्षेच्या कारणास्तव पाटोदा पोलीस स्टेशनच्या पीएसआय (झडख) क्रमांकावर रात्री १:४६ वाजता संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांकडून हा फोन उचलला गेला नाही.




पोलीस स्टेशनचे नंबर काय फक्त हळद-कुंकवाचे निमंत्रण देण्यासाठी आहेत का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.पेट्रोल-डिझेलच्या खर्चावर प्रश्नचिन्हशहरात पोलिसांची गाडी गस्त घालताना दिसत नाही, असा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या नावाखाली मोठा खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात पोलीस प्रशासन सुस्त असल्याचा दावा करण्यात येत आहे. जर संकटकाळी पोलीस धावून येत नसतील, तर या शासकीय खर्चाचा उपयोग काय, असा प्रश्न आता विचारला जात आहे.एसपींकडे कानउघडणीची मागणीपाटोदा शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असून, जिल्हा पोलीस अधीक्षक (SP) कावत साहेब यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी,


◀◀ पान ३ वर

# हा प्रामाणिक विद्यार्थ्यांचा नाही तर देशाच्या भविष्याचा पराभव आहे -डॉ राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

नीट २०२६ परीक्षा रद्द होणे हा केवळ एका परीक्षेपुरता विषय नाही, तर देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे, अशी भावना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी व्यक्त केली आहे.

यावर्षी देशभरातून तब्बल २२.७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली. ५४०० पेक्षा अधिक परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली. महाराष्ट्र हा नीटसाठी सर्वाधिक



विद्यार्थी देणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि बिहार या चार राज्यांमधूनच देशातील ४१% पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेला

### नीट २०२६ परीक्षा रद्द : लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा, परीक्षा पद्धतीत मूलभूत बदलांची मागणी

बसतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे भविष्य एका केंद्रीकृत यंत्रणेवर अवलंबून असणे हीच चिंतेची बाब ठरत आहे.

यावेळी डॉ इंगोले यांनी सरकारी भोंगळ कारभारामुळे शासकीय व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत असे मत व्यक्त केले.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामागे वर्षानुवर्षांची मेहनत आहे. अनेकांनी मोबाईल, मनोरंजन, सण, मित्र आणि सामाजिक आयुष्य बाजूला ठेवून फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. पालकांनी कर्ज काढले, शेती विकली, बचत खर्च केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरात येऊन संघर्ष केला. डॉक्टर होण्याचे स्वप्न हे फक्त करिअर नसून अनेक कुटुंबांच्या आशा आणि आयुष्याशी जोडलेले आहे.


अशा परिस्थितीत परीक्षा प्रक्रियेत

◀◀ पान ३ वर

# शिक्षणाच्या जोरावर मिळवले यश; निशिगंधा ओगलेची मंत्रालयात लिपिक पदावर निवड

परळी । प्रतिनिधी

परळीसारख्या शहरातून अत्यंत सामान्य परिस्थितीत शिक्षण घेत पुढे आलेल्या कु. निशिगंधा सिधू ओगले हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर महसूल विभागातील लिपिक पदावर निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.तीचे शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात नवी मुंबई वाशी येथे झाले आहे.उद्यापासून ती मंत्रालय, मुंबई येथे सेवेत रुजू होणार आहे.



निशिगंधाचे वडील सिद्धू उर्फ सिद्धार्थ ओगले हे मुंबईसारख्या मोठ्या शहरात गॅस टाकी सप्लाय करण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुटुंबात आई रंजना सिधू ओगले,भाऊ निशिकांत सिधू ओगले आणि सगळ्यात छोटी बहीण निशिता सिधू ओगले असा परिवार आहे. कुटुंबाची परिस्थिती सर्वसाधारण असतानाही मुलीच्या शिक्षणासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत निशिगंधानेही शिक्षणात सातत्य ठेवून हे यश प्राप्त केले.फक्त शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे निशिगंधाने सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या या यशामुळे ओगले परिवारासह परळी शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. निशिगंधाच्या यशाबद्दल सर्व स्तरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# किरकोळ वादातून कुटुंबावर लोखंडी पाईपने हल्ला; गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

पाटोदा येथील माऊली नगर परिसरात दिनांक ८ मे २०२६ रोजी रात्री उशिरा एका तरुणाने जुन्या वादातून शेजारील कुटुंबावर लोखंडी पाईप आणि लाकडी दांडक्याने भीषण हल्ला केला. या हल्ल्यात तक्रारदार, त्यांचे आई-वडील आणि बहीण गंभीर जखमी झाले आहेत.घटनेचा तपशील:तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, ८ मे रोजी रात्री सुमारे १२:१५ च्या सुमारास ते आपल्या घरी असताना, आरोपी मुकेश बाळू आडागळे (रा. माऊली नगर, पाटोदा) याने घरात शिरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने लोखंडी पाईपने तक्रारदाराच्या नाकावर आणि डोक्यावर वार केले.जेव्हा तक्रारदाराचे आई-वडील आणि बहीण त्यांना वाचवण्यासाठी मध्ये आले, तेव्हा आरोपीने त्यांनाही लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. इतकेच

◀◀ पान ३ वर



बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करताना मुख्य लेखा वित्त अधिकारी घायाळ ,ढोले, अडसूळ, लेखा अधिकारी सुधीर ठोंबरे, सव्वाशे ,राऊत ,फुंदे ,वैरागे यांच्यासह सर्व सहाय्यक लेखाधिकारी भंडारपाल आदी उपस्थित होते.

# राज्यातील ४८८ शाळांमध्ये टाकळसिंगची दणदणीत एन्ट्री!

## गुणवत्तेच्या जोरावर जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला पीएम श्री आदर्श शाळेचा बहुमान

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शिक्षणाचा झेंडा उंचावत आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग ने राज्याच्या शैक्षणिक नकाशावर पुन्हा एकदा आपली ठळक छाप उमटवली आहे. गुणवत्ता, शिस्त, सातत्यपूर्ण निकाल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या बळावर या ऐतिहासिक शाळेची पीएमसी आदर्श शाळा अंतर्गत राज्य शासनाच्या आदर्श शाळा उपक्रमासाठी निवड झाली असून राज्यातील पहिल्या टप्प्यातील ४८८ मानांकित शाळांमध्ये टाकळसिंगचा मानाचा तुरा रोवला गेला आहे.




ही केवळ निवड नाही, तर ग्रामीण शिक्षणाच्या सामर्थ्याला मिळालेली राज्यस्तरीय दाद आहे.

१९५० पासून ज्ञानसेवेची अखंड परंपरा

सन १९५० मध्ये थोर स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय आसराजीरावजी जगताप यांच्या प्रेरणेने सुरू झालेली ही प्रशाला आज गुणवत्तेचे विद्यापीठ म्हणून ओळखली जाते. गेल्या सात दशकांत या शाळेने हजारो विद्यार्थी घडवले असून अनेकांनी प्रशासन, शिक्षण, पोलीस, कृषी आणि विविध क्षेत्रांत सर्वोच्च पदे गाठली आहेत.

माजी कृषी उपसंचालक तुकाराम जगताप, सीपीआर पुणेचे पोलीस अधीक्षक काकासाहेब डोळे आणि शिक्षण विभागातील शिक्षण उपसचिव आबासाहेब कवळे यांसारखे मान्यवर या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत.

११ गावांचा विश्वास, ५२० विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य

टाकळसिंग, सांगवी, हिंगणी, दैठणा, हनुमंतगाव, खानापूर, चिखली, तवलवाडी, वाळुंज, पारगाव आणि बळेवाडी या ११ गावांतील सुमारे ५२० विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. या शाळेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे आदर्श केंद्र म्हणून स्थान निर्माण केले आहे.

निकालात शंभर टक्के परंपरा, शिष्यवृत्तीत कोटींची कामगिरी

एसएससी बोर्ड परीक्षेचा सातत्यपूर्ण १०० टक्के निकाल

चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश

अंतर्गत विद्यार्थ्यांना आतापर्यंत सुमारे दीड कोटी

# कुठलीही शिकवणी न लावता आईच्या मोबाईलवर अभ्यास करत आयुष ने मिळवला परळी तालुक्यातुन प्रथम क्रमांक

परळी । प्रतिनिधी

युवा व किशोरवयीन मुलांच्या हाती मोबाईल आला की,रिल्स, इन्स्टाग्राम,फेसबुक असा सोशल मीडिया आणि ऑनलाईन गेम हे नित्याचेच मोबाईलच्या ऑनलाईन तंत्रज्ञानाचा फक्त आपल्या अभ्यासासाठी उपयोग करत आईच्या मोबाईलवर दोन तास ऑनलाईन आणि शाळेतील शिकवणीचे योग्य नियोजन लावत इयत्ता दहावीच्या परिक्षेत परळी तालुक्यातुन प्रथम येण्याचा मान गणेशपार भागातील चि.आयुष मोहन संघई या विद्यार्थ्याने मिळवत विद्यार्थ्यांनी मोबाईलचा पॉझिटिव्ह वापर कसा करावा



याचा आदर्श घालुन दिला आहे.

परळी शहरातील गणेशपार भागात दिगंबर जैन मंदिर समोरील रहिवासी मोहनराव संघई यांना आयुष आणि आगम ही दोन मुले.मोठा मुलगा आयुष हा शहरातील फाउंडेशन स्कुलमध्ये शिक्षण घेत यावर्षी दहावीची परिक्षा दिली.दहावी म्हटले की महागडे आणि प्रत्येक विषयाचे वेगवेगळे क्लासेस लावण्याची स्पर्धा सर्वत्र असताना लहानपणापासुनच अभ्यासात मग्न असलेल्या आयुषने मला कुठलाही क्लास नको फक्त अभ्यासाचे रिव्हीजनसाठी एखादा ऑनलाईन क्लास हवा अशी इच्छा व्यक्त केल्यानंतर वडिल मोहनराव आणि चुलते महावीर संघई यांनी आयुषला फिजिक्स वाला हा ऑनलाइन क्लास लावुन दिला.शाळेतील अभ्यासाला जोड म्हणुन आयुषने हा क्लास जॉईन केला

◀◀ पान ३ वर

# कवी नायगावकरांनी बीडकरांना मनमुराद हसवले; रसिक फाउंडेशनचे बहारदार आयोजन

बीड । प्रतिनिधी

जुन्या आणि वर्तमान परिस्थितीसह अनेक विषयांवर चौफेर फटकेबाजी करून हास्यकवी अशोक नायगावकर यांनी शनीवारची सायंकाळ दणाणून सोडली. प्रत्येक वाक्यागणिक पिकलेला हशा आणि रसिकांची मिळालेली भरभरून दाद झेलून नायगावकरांनी मिश्कीलपणे बीडकरांना मनमुरादपणे हसायला लावले.त्यांच्या सोबतच्या कवी प्रभाकर साळेगावकरांनी विडंबनात्मक कविता गाऊन सादर करीत रसिक श्रोत्यांना कविता आणि गाण्याचा आनंद दिला.

शनीवार दि ९ मे रोजी रसिक फाउंडेशनच्या वतीने प्रसिद्ध कवी अशोक नायगावकर ( मुंबई ) आणि प्रभाकर साळेगावकर( माजलगाव )यांच्या कवितांचा ' हस्यकल्लोळ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रारंभी महेश वाघमारे यांनी रसिक फाउंडेशनच्या कार्यक्रमाची माहिती देऊन या सांस्कृतिक चळवळीत रसिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले.पाहुण्यांचा परिचय डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर यांनी तर सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन विकास उमापूरकर यांनी केले. कवी प्रभाकर साळेगावकर यांनी आता अशोक नायगावकर कविता सादर करतील,' असं जाहीर केले आणि की, काही तरी वेगळं आणि भन्नाट ऐकायला मिळणार म्हणून उत्सुक श्रोत्यांना झुपकेदार मिशांच्या कविवर्यांनी नेहरू शर्टची बाही सावरत त्यांच्या



खास शैलीतील 'मी तुम्हाला सांगतो…' असं बोलत सभागृहातील श्रोत्यांचा ताबा घेतला

'तुम्ही सगळे कसे इथे अगदी प्रेमाने जमलेले आहात. आमच्या घरी तुम्हाला सांगतो, माझ्या मुली म्हणतात…

अशोक नायगावकर आवर फादर
आलिया भोगासी असावे सादर

कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच नायगावकर यांनी सभागृहाचा ताबा घेतला.स्त्री वर्गाच्या एकूणच कष्टाची आणि त्यांनी आज नव्या युगात घेतलेल्या भरारीचे त्यांनी विनोदी आणि गंभीर अंतर्मुख करणाऱ्या शैलीतील कविता सादर केल्या.

टिळक,तुम्ही चौपाटीवर इथे कशासाठी उभे आहात ?
अहो, पाणीपुरी भेळपुरी खाणं हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे
आणि आम्ही तो रोज मिळवणारच ''

ही कविता सादर करून वर्तमान स्थितीवर मार्मिक पण मर्मभेदी भाष्य केले.

'शाकाहारी' ही कविता सादर करून त्यांनी वांगी आणि भोपळ्याचे दुःख मांडले. भाजा, फळे, मसाले स्वयंपाकघरात कसे चिरडले जातात, याचे वर्णन कवितेतून मांडत नायगावकर यांनी रसिकांना पोटधरून हसण्यास भाग पडले. ही कविता म्हणजे या कार्यक्रमाचा परमोच्च बिंदू होता.नायगावकर यांच्या एकामागून एक टाकलेल्या गुगलीला रसिक दिलखुलास दाद देत होते. तब्बल दीड तास सभागृहात हास्याचे फवारे उडत होते.

'सध्या लोक वाचतच नाहीत पण सांस्कृतिक क्षेत्रातील माणसांमुळेच महाराष्ट्र टिकून राहिला आहे. सध्याचे शहरी वातावरण साहित्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने अत्यंत गढूळ झाले आहे.मात्र ग्रामीण भागात सकस लिहिले जात आहे.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी वाचकांची ओढ वाढली आणि मराठी

◀◀ पान ३ वर



नगरपंचायत चे पाणीपुरवठा सभापती घटनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक किशोर मामा झरेकर यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना कासारी माऊली नगर ग्रामपंचायत सदस्य कपिल शेठ अग्रवाल पत्रकार शरद भाऊ रेडेकर, रघुनंदन कटके, मंडले शेठ, संतोष जगताप छाया. सचिन ईदंलकर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.१३ मे २०२६ । पान ७

# पथ विक्रेत्यांसाठी महापालिकेचा इशारा; ३१ मेपर्यंत नूतनीकरण करा, अन्यथा परवाना रद्द

**पुणे प्रतिनिधी**

महापालिका क्षेत्रातील पथ विक्रेत्यांसाठी प्रशासनाने कडक पवित्रा घेतला असून, फेरीवाला प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी आता ३१ मेपर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. विशेष म्हणजे, २०१८ पासून तब्बल १८५० हॉकर्सनी २० कोटी ५ लाख रुपये थकवल्याचे समोर आले आहे. या थकबाकीदारांसह नूतनीकरण न करणाऱ्यांवर आता परवाना रद्द करण्याची टांगती तलवार आहे.

शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १ हजार ८५० फेरीवाल्यांनी गेल्या आठ वर्षांपासून परवाना शुल्क भरलेले नाही. यामध्ये सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वाधिक ३५ कोटींची थकबाकी असून, त्याखालोखाल कसबा-विश्रामबागवाडा ३६ कोटी आणि धनकवडी-सहकारनगर विभागाचा क्रमांक लागतो. ही अवाढव्य थकबाकी वसूल करण्यासाठी आणि




परवानाधारकांचे प्रमाणीकरण करण्यासाठी महापालिकेने नूतनीकरण प्रक्रिया अनिवार्य केली आहे.जाणीव हातगाडी फेरी पथारी स्टॉलधारक संघटनेने केलेल्या मागणीनंतर अतिक्रमण निर्मूलन विभागाने नूतनीकरणाची मुदत १५ एप्रिलवरून वाढवून ३१ मे केली आहे. मात्र, ज्यांनी बिलाची मागणी करूनही बिल मिळाले नाही किंवा ज्यांचे प्रमाणपत्र प्रलंबित आहे, त्यांची सर्व प्रकरणे रद्दबातल ठरविण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्यामुळे अधिकृत परवाना वाचविण्यासाठी पथ विक्रेत्यांची मोठी धावपळ सुरू आहे. 'ज्या पथ विक्रेत्यांकडे प्रमाणपत्र आहे, त्यांनी तातडीने शुल्क भरून नूतनीकरण अर्ज सादर करावा; अन्यथा महापालिका परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करेल,' असा इशारा 'जाणीव' संघटनेचे कार्यवाह संजय शंके यांनी दिला आहे. पथ विक्रेत्यांनी अर्जासोबत फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र, आधार-पॅन कार्ड, रेशनिंग कार्ड, बँक पासबुक आणि व्यवसायाच्या ठिकाणचा 'लॅट-लाँग' फोटो जोडणे अनिवार्य आहे. ज्या सभासदांना अर्ज भरण्यात अडचण येत आहे, त्यांच्यासाठी जाणीव संघटना कार्यालयात सकाळी १० ते १ या वेळेत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे. ३१ मेनंतर कोणतीही मुदतवाढ मिळणार नसल्याने ही पथ विक्रेत्यांसाठी शेवटची संधी ठरणार आहे

# मंचरमध्ये भीषण अपघात; युवक ठार, युवती गंभीर जखमी

**मंचर । प्रतिनिधी**

पुणे-नाशिक जुन्या महामार्गावरील मंचर (ता. आंबेगाव) शहरातील पिंपळगाव फाटा चौकात मंगळवारी (ता. १२) संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर सोबत असलेली युवती गंभीर जखमी झाली. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



या अपघातात ऋषिकेश गोरख सुर्वे (वय २६ रा. चरोली- आळंदी मुळगाव वानेवाडीकाती जिल्हा धाराशिव) यांचा जागीच मृत्यू झाला. तर कावेरी वाघमारे (वय २३ रा उंब्रज क्रमांक एक तालुका जुन्नर) या गंभीर जखमी झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कावेरी वाघमारे या अवसरी खुर्द येथील तंत्रशिक्षण महाविद्यालयात शिक्षण घेत होत्या. त्या ऋषिकेश सुर्वे यांच्यासमवेत मोटरसायकलवरून उंब्रजकडे जात होत्या. पिंपळगाव फाटा चौकातून नारायणगावच्या दिशेने जात असताना शेजारून जाणाऱ्या भरधाव ट्रकच्या धक्क्याने सुर्वे हे ट्रकखाली फेकले गेले. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्वप्नील लोखंडे यांनी तत्काळ मदतकार्य करत ऋषिकेश सुर्वे यांना मंचर उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले. तेथे डॉ. अश्विनी घोडे , डॉ. प्रवीण देशमुख व डॉ मीनल भालचीयांनी तपासणी करून सुर्वे यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या कावेरी वाघमारे यांच्यावर मंचरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मंचर पोलिस ठाणे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, पिंपळगाव फाटा चौकात वारंवार अपघात होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर येथे मंचर नगरपंचायत व पोलिस प्रशासनाने पुढाकार घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच सिग्नल व्यवस्था उभारावी, अशी मागणी स्थानिक नागरिक ऋषिकेश गावडे यांनी केली आहे.

# होर्डिंगचे शुल्कावर तडजोड नाही; महापालिका आयुक्त

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेला होर्डिंगमधून मिळणारे शुल्क हे पुणे महापालिकेच्या १० पट जास्त आहे. सध्याचे पुणे महापालिकेचे उत्पन्न हे खूप कमी आहे. त्यामुळे नवीन शुल्क निश्चिती करताना किमान ७०० ते ७५० रुपये प्रति चौरस फूट असण्याची शक्यता आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याचे संकेत दिले असून, उत्पन्न वाढीसाठी शुल्क कमी करण्यासंदर्भात तडजोड केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही वर्षापासून पुणे महापालिका आणि होर्डिंग व्यावसायिकांमध्ये शुल्क आकारणीवरून वाद सुरु आहे. यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्यात त्यात महापालिकेच्या बाजूने निकाल लागला आहे. महापालिकेतर्फे नवीन शुल्क धोरण तयार केले जात असून, त्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

महापालिकेने २०१३ मध्ये शहरातील जाहिरात फलकांसाठी प्रति चौरस फूट २२२ रुपये दर निश्चित केला होता. या दराविरोधात २०१८ मध्ये होर्डिंग व्यावसायिकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. महापालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करताना, २०१३ मध्ये निश्चित करण्यात आलेला २२२ रुपयांचा दर आणि दरवर्षी १० टक्के वाढीच्या सूत्रानुसार २०२३ मध्ये भाडेदर ५८०




रुपये निश्चित करण्यात आल्याचे स्पष्ट केले होते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये उच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल दिला. त्याविरोधात व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान व्यावसायिकांच्या वकिलांनी भाडेदरांवर स्थगिती देण्याची विनंती केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत शुल्क वाढीस स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे महापालिकेचा होर्डिंगच्या थकबाकी वसुलीचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच नव्या दर निश्चितीची प्रक्रियाही सुरू झाली आहे. याबाबत आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आम्ही शुल्क निश्चिती करणार आहोत, हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकेत पुण्यापेक्षा १० पट जास्त इतके उत्पन्न मिळते. तेथील शुल्क ही खूप जास्त आहे. त्यातुलनेत पुणे महापालिकेचे शुल्क खूप कमी आहे. काही जण होर्डिंगचे शुल्क प्रति चौरस फूट ३५० रुपये असावे अशी मागणी करत आहेत. पण हे शुल्क ७०० ते ७५० रुपये प्रति चौरस फूट असू शकते. त्यावर अंतिम निर्णय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत घेतला जाणार आहे.

# पुणे महापालिकेचा बडगा! अकोमोडेशन रिझर्वेशनच्या जागा ताब्यात घेणार

**पुणे । प्रतिनिधी**

समावेशक आरक्षण (अकोमोडेशन रिझर्वेशन ) अंतर्गत मंजूर प्रकल्पांतील महापालिकेला मिळणारे शेकडो गाळे, सदनिका आणि इतर जागांचा ताबा अद्याप पालिकेला मिळालेला नाही. मुख्यसभेत आणि स्थायी समितीत नगरसेवकांनी हे प्रकार समोर आणल्यानंतर खडबडून जागे झालेल्या पालिकेच्या बांधकाम विभागाला या जागांची आठवण झाली आहे.




त्यामुळे देय जागांची माहिती १५ मे पर्यंत देण्याचे आदेश शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिले आहेत. बांधकाम अभियंत्यांनी अकोमोडेशन रिझर्वेशन अंतर्गत बांधकामांना दिलेल्या परवानग्या, ज्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले त्या प्रकल्पातील पालिकेला देय असलेल्या जागांची माहिती मुदतीत द्यावयाची आहे. त्यानुसार एआर प्रकल्पांची छाननी करून कोणत्या प्रकल्पांतील जागा पालिकेकडे आल्या नाहीत, याचा अहवाल द्यावयाचा आहे. अशा जागांचा तातडीने ताबा घेण्याची कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. समावेशक आरक्षण ही संकल्पना शहरातील सार्वजनिक सुविधा वेगाने उपलब्ध होण्यासाठी महत्त्वाची आहे. जमीन संपादनासाठी होणारा मोठा खर्च आणि वेळ टाळण्यासाठी याचा वापर केला जातो. मंजूर प्रकल्पांतील जागांचा ताबा वेळेत न मिळाल्यास पालिकेच्या सुविधा प्रकल्पांवर परिणाम होत असतो. पालिकेस मिळणारे गाळे, सदनिका, व्यावसायिक जागांचा वापर सध्या अनेक ठिकाणी विकसक करत आहे. त्याबाबत तक्रारी आलेल्या असतानाही बांधकाम विभागाने जागा ताब्यात घेतलेल्या नाहीत. त्यामुळे विकसक त्याचा व्यावसायिक वापर करत त्यातूनही उत्पन्न मिळवत आहेत. दुसरीकडे एवढ्या महत्वाच्या बाबीची माहिती बांधकाम विभागाकडे का नाही, असा सवालही उपस्थित होत आहे. शहर विकास आराखड्यात (डीपी) सार्वजनिक सुविधा, शाळा, रुग्णालय, उद्यान, कार्यालये किंवा इतर नागरी सुविधांसाठी आरक्षित जागांवर अकोमोडेशन रिझर्वेशन ही तरतूद लागू होते. ही समावेशक किंवा समायोजन आरक्षण म्हणून ओळखली जाते.

# पिंपळगाव जोगा धरणाच्या कालव्याला भगदाड, पाण्याच्या प्रचंड वेगाने पिके गेली वाहून!

**पुणे । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणाच्या कालव्याला धरणापासून दीड किलोमीटरच्या अंतरावर मंगळवारी (दि. १२) पहाटे सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास मोठे भगदाड पडून कालवा फुटला. यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले असून परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

कालवा फुटताच पाण्याचा प्रचंड वेगाने ओघ सुरू झाला आणि आसपासच्या शेतजमिनींमध्ये पाणी शिरले. त्यामुळे अनेक शेतातील पिके पाण्याखाली जाऊन वाहून गेली. घटनेची माहिती मिळताच शेतकरी संतोष निमसे यांनी तातडीने धरणावर धाव घेत कालव्याचे पाणी बंद करण्यासाठी प्रयत्न केले. सुमारे अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनंतर कालव्याचे पाणी बंद करण्यात यश आले. त्या वेळी कालव्यात सुमारे २६० क्युसेक वेगाने पाणी वाहत होते, अशी माहिती समोर आली आहे. या घटनेत संतोष बबन निमसे व सुनील निमसे यांच्या सुमारे ५ एकर क्षेत्रातील धना, टोमॅटो, मिरची ही पिके तसेच सुपीक माती वाहून जाऊन अंदाजे २५



लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. शेखर भाऊसाहेब हांडे यांच्या २ एकर ऊस पिकात पाणी साचले असून ३० गुंठे क्षेत्रातील काढणीस आलेली बाजरीही भुईसपाट झाली असून मोठे नुकसान झाले. याशिवाय शंकर सखाराम हांडे व त्यांच्या बंधूंच्या सुमारे ५ एकर क्षेत्रातील फुले व धना पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. परिसरातील सुमारे ३० एकर क्षेत्रात पाणी साचल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पाटबंधारे विभागाचे कर्मचारी व स्थानिक शेतकरी घटनास्थळी दाखल झाले होते.

# मल्टी-लेव्हल पार्किंग सक्षम करा; महापौर मंजुषा नागपुरे यांचे आदेश



**पुणे । प्रतिनिधी**

वाढत्या वाहनसंख्येच्या पार्श्वभूमीवर पार्किंग व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ऑनलाइन नियंत्रण प्रणाली विकसित करण्याबरोबरच मल्टी-लेव्हल पार्किंग प्रकल्पांना गती देण्याचे आदेश महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रशासनाला सोमवरी दिले. नागरिकांना अधिक सोयीस्कर पार्किंग सुविधा देण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यावर भर देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. बैठकीत अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) प्रजीत नायर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. बैठकीत घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना कचरा संकलनासाठी आवश्यक वाहनांची संख्या, चालकांची उपलब्धता तसेच ओला, सुका कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यावर भर दिला.

# पाषाणमध्ये बालाजी चौकात वाहतूक कोंडी! रहिवाशांच्या महापालिका-पोलिसांकडे या ४ मागण्या

**पुणे । प्रतिनिधी**

पाषाणमधील बालाजी मंदिर गल्ली आणि बालाजी चौक परिसरातील रहिवाशांनी व्हॉईस ऑफ पाषाण (तेळलशेष झरिहरप) या अभियानांतर्गत रविवारी, १० मे २०२६ रोजी व्यापक वाहतूक जनजागृती मोहीम राबवली.

वाहतूक पोलीस विभागाच्या सहकार्याने आयोजित या मोहिमेद्वारे परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीकडे लक्ष वेधण्यात आले. बालाजी मंदिर गल्ली हा परिसर १५ पेक्षा जास्त मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांसाठी बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग असून, दररोज २,००० हून अधिक वाहने या मार्गाचा वापर करतात.या एकाच अरुंद मार्गावर अवलंबून असलेल्या वाहनसंख्येमुळे येथे दररोज मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.




या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नागरिकांनी या मोहिमेचे आयोजन केले होते. 'नो पार्किंग' क्षेत्राची आवश्यकता: रस्त्याच्या एका बाजूला अस्ताव्यस्त होणाऱ्या पार्किंगमुळे रस्ता अरुंद होत असून, या ठिकाणी अधिकृतपणे 'नो पार्किंग' क्षेत्र घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. अतिक्रमण निर्मूलन: पादचारी मार्ग आणि रस्त्यांवरील अनधिकृत विक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होत असून, ते तातडीने हटवण्याची विनंती पोलिसांकडे करण्यात आली आहे. सिग्नलच्या वेळेत बदल: सोसायट्यांतून बाहेर पडणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने बालाजी मंदिर गल्लीतून मुख्य रस्त्यावर येण्यासाठी सिग्नलचा 'ग्रीन' वेळ वाढवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

# २१ लाखांच्या बदल्यात खेळण्यातील ५० लाखांच्या नोटा; मॅट्रिमोनिअल फ्रॉडचा धक्कादायक प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

विवाह विषयक संकेतस्थळावरील ओळखीतून एकाने तरुणीला २१ लाखांचा गंडा घातला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणीने पैसे मागितल्यावर खेळण्यातील नोटा असलेली पन्नास लाखांची बॅग हवाली केली. याप्रकरणी ३२ वर्षीय तरुणीने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गोरखनाथ गावंडकर (रा. कडसुरे, रायगड) याला अटक केली आहे.

त्याला न्यायालयाने १३ मे पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. फिर्यादीनुसार तरुणी घटस्फोटीत असून गोरखनाथशी मार्च २०२५ मध्ये विवाह विषयक संकेतस्थळाच्या माध्यमातून परिचय झाला. त्याने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून विश्र्वास संपादन केला. आपण आर्थिक अडचणीत असून, पैशाची गरज आहे असे सांगून वेळोवेळी २१ लाख रुपये उकळले.


काही दिवसानंतर आपली फसवणूक होत असल्याची चाहूल लागल्यावर तिने गोरखनाथकडे पैसे मागितले. १५ फेब्रुवारी गोरखनाथ पुण्यात आला असता तरुणीला सिंहगड रोडवरील एका हॉटेलबाहेर भेटायाला बोलावले. त्याने एक काळ्या रंगाची बॅग आणली होती. त्याने सांगितले बॅगेत पन्नास लाख असून तुझे २१ लाख रुपये घे, आणि राहिलेले पैसे मला आरटीजीएसद्वारे पाठवून दे. त्यानंतर गोरखनाथ तेथून निघून गेला. बॅगेला लॉक होते.

त्यामुळे तरुणीने तेथे जागेवर उघडून पाहिली नाही.

# अत्याचार करताना ४ ते ५ मुलांनी थांबवण्याचा प्रयत्न केला, पण आरोपीने समोर दगड भिरकावला; नसरापूर प्रकरणातला सगळ्यात मोठा पुरावा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिला निर्घृणपणे संपवलं, या प्रकरणाच्या तपासासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. या प्रकरणाच्या गुन्ह्यात पोलिसांच्या हाती प्रत्यक्षदर्शी म्हणून ठोस पुरावा सापडला आहे. धक्कादायक बाबा म्हणजे या नराधमाला अत्याचार करताना ४-५ मुलांनी अडवण्याचा प्रयत्नही केला असल्याची माहिती समोर आली आहे. तेव्हा या नराधमाने त्या प्रत्यक्षदर्शी मुलाना दगड भिरकावून पळवून लावल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे. दरम्यान, प्रत्यक्षदर्शी मुलांवर दगड फेकून मारल्याचा महत्वाचा सीसीटीवी पोलिसांनी जप्त केला असून त्या प्रत्यक्षदर्शी मुलांची ई-साक्ष देखील नोंदवून घेतली आहे. या घटनेमुळे नराधमाचा क्रूर चेहरा समोर आला असून पोलिसांच्या तपासालाही गती मिळाली आहे.




दुसरीकडे, नसरापूर अत्याचार करून तिला निर्घृणपणे संपवलं, या प्रकरणातील आरोपीला आणखी दोन दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीला आज (मंगळवारी, ता १२) ऑनलाईन पध्दतीने न्यायालयात हजरकरण्यात आले, यावेळी त्याला आणखी दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. नसरापूर घटनेतील आरोपीला १४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आज पुण्यातील शिवाजीनगर सत्र न्यायालयात आरोपीला हजर करण्यात आलं होतं. ऑनलाइन पद्धतीने आरोपीला कोर्टात हजर केलं होतं. यावेळी त्याला कोर्टाने विचारलं, पोलिसांविरोधात तक्रार आहे का? त्यावर आरोपीने, नाही, असे उत्तर दिलं. संपूर्ण युक्तिवाद पार पडल्यानंतर २४ मे पर्यंत आरोपीला पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या प्रकरणी सर्वत्र संतापाची लाट उसळल्यानंतर या अत्याचार प्रकरणात सरकारने विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ अजय मिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नसरापूर प्रकरणाची सुनावणी प्रभावीपणे आणि जलदगतीने पार पाडण्यासाठी शासनाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. अशातच आता या अत्याचार प्रकरणाबाबत एक महत्वाची माहिती समोर आली असून राज्य सरकार विशेष न्यायालय स्थापन करण्याबाबत अध्यादेश काढण्यात आल्याची माहिती आहे.

# दौंडमध्ये नेत्यांच्या जाचाला कंटाळून मुद्रांक विक्रेत्याने उचलले टोकाचे पाऊल, दीड कोटीचं कनेक्शन?

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहरातील प्रसिद्ध मुद्रांक विक्रेते विवेक शंकर गटणे (रा. महादेव गल्ली, दौंड) यांनी सोमवारी( दि. ११) राहत्या घरात आत्महत्या केली. बड्या राजकीय नेत्यांचा पाठिंबा असलेल्या काही स्थानिक राजकारण्यांच्या जाचाला कंटाळून व त्यांना दिलेले जवळपास दीड ते पावणे दोन कोटी रुपये परत मिळण्याची आशा संपल्याने घटने यांनी आत्महत्या केली.

दौंड येथील एक जमीन विकून आलेले पैसे गटणे यांनी काही स्थानिक राजकारणी जमिनीचे दलाल यांच्या माध्यमातून फायनान्स कंपनीकडे लावले होते त्यातून चांगला परतावा मिळेल असे या लोकांनी गटणे यांना सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले होते.परंतु तसे काही होत नसल्याचे पाहून तसेच वारंवार तगादा लावूनही पैसे मिळत नाहीत असे लक्षात आल्यानंतर निराशेतून गटणे यांनी आत्महत्येचे पाऊल उचलल्याचे समजते. याच कारणामुळे बहुदा नैराश्यातून त्यांनी आत्महत्या केली असावी असा पोलिसांचा कयास आहे त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी शहरातील काही बड्या राजकीय नेत्यांच्या बगलबच्चांना ही रक्कम दिली होती, त्याची सविस्तर नोंद त्यांनी त्यांच्या १२५ पानी पुस्तकेत केली आहे.पोलीसांनी ही पुस्तिका जप्त केली आहे. त्यामध्ये अनेकांना मोठमोठ्या रकमा सोने-चांदी दिल्याचे नमूद केले आहे,त्यांनी या वहीमध्ये काही व्यक्तींची नावे लिहिली आहेत.